काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112
EYE Q MEDIA



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ०१.०१.२०२५ | अंक नं. २५५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायसेंस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG Whirlpool SONY SAMSUNG KENSTAR JVC Electrolux



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# कचऱ्याचे संकलन करणाऱ्या गाडीवरील कामगारांचे आरोग्य धोक्यात नाही ना?

## अरे माणसा माणसा कधी होशील तू माणूस असा प्रश्न मनपा आयुक्त व आरोग्य अधिकाऱ्यांना विचारला तर वावग ठरणार नाही


कचरा गाडीवर कचरा संकलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले नाही ना ? (छाया - अमित मन्यार)

नगर - नगरसेवक, कचरा संकलन गाड्या उपनगरांमध्ये तसेच शहरांमध्ये मागील काही दिवसापासून अदृश्य झाल्या होत्या. यामुळे शहरांमध्ये तसेच उपनगरामध्ये कचऱ्याचे ढिगारे ओसंडून वाहू लागल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत होते. या कचरा प्रश्नावर दैनिक नवा मराठा मधून आवाज उठवल्यानंतर मनपा प्रशासनाला जाग आली खरी पण ज्यावेळेस या अदृश्य झालेल्या घंटागाड्या 'कचरा गाडी आली हो कचरा गाडी आली' च्या ध्वनिक्षेपात प्रभागांमध्ये प्रकट झाल्या. त्यानंतर प्रभागातील नागरिकांनी कचऱ्याच्या दुर्गंधीतून सुटकेचा निश्वास टाकला खरा पण या गाडीवर नेहमीच येणारे कर्मचारी गायब झाल्याचे दिसून आले. काही ठिकाणी जुने कर्मचारी तर काही ठिकाणी नवीन कर्मचाऱ्यांची भर पहावयास मिळाली. काही प्रभागातील नागरिकांनी नेहमीच येणाऱ्या कर्मचाऱ्याबद्दल सहजच विचारले असता त्यांनी आपल्याकडे येणाऱ्या कर्मचाऱ्याची मयत झाल्याचे सांगितले. हे एकूण नेहमी येणाऱ्या कर्मचाऱ्याबद्दल नागरिकांना हळहळ वाटली, पण ज्यावेळेस दुसऱ्या दिवशी नेहमीचा कर्मचारी त्यांच्यासमोर पुन्हा उतरला तर मात्र त्याला पाहून प्रभागातील नागरिक अवाक् झाले. झालेला प्रकार दस्तुरखुद्द त्याच कर्मचाऱ्याला सांगितल्यानंतर तो देखील स्वतःची खबर ऐकून एक प्रकारे गतप्राणच झाला हो? अहो ही अशी कशी थट्टा मस्करी, का फक्त गाड्या आल्या नाही म्हणून निर्ढावलेल्या त्या कर्मचाऱ्यांनी वेळ मारून नेली काय? हा सवाल मात्र अनुत्तरीतच राहिला!

आता तर आयुक्त, आरोग्य अधिकारी, या कचरा संकलन करणाऱ्या गाड्यांवरील जुने कर्मचारी दिसेनासे झाले आहे व त्यांच्या जागेवर परराज्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली दिसून येत आहे. सदर कर्मचाऱ्यांपैकी जो मदतीला येत आहे, तो चक्क कचरा गाडीमध्ये, ज्या ठिकाणी कचरा टाकला जातो, त्या कचऱ्याच्या हौदातच महिला कर्मचारी बसून कचरा त्यातच टाकत आहे. यामुळे त्या कचऱ्याच्या असणाऱ्या गाडीमध्ये दृश्य, अदृश्य अशा विषाणूंमुळे त्या महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्यास किती मोठा धोका निर्माण होऊ शकतो, हे तिलाही कळत नसले तरी आपणाला मात्र कळत असेल ना? कर्मचारी पोटाच्या खळगीसाठी हे आपले काम जीवावर बेतेल इथपर्यंत करत आहे, यात मात्र शंका नाहीच.

आयुक्त व आरोग्य अधिकारी आपणच जरा पुढाकार घेऊन माणूस म्हणून ठेकेदाराला थोडी समज दिली तर या कर्मचाऱ्याला व अशा अनेक जणांची यातून सुटका होईल. आपल्या एका चांगल्या कामाची नगरकर नक्कीच प्रशंसा करतील बर का? नाहीतर नगरकरांना पुन्हा एकदा असंच म्हणावं लागेल अरे माणसा, माणसा, कधी होशील तू माणूस, आणि हो कचरा गाडी उंच असल्यामुळे सामान्य माणसाची कचरा टाकण्यासाठी मोठी कसरत करावी लागते ते पण एकदा पाहून घ्या. कारण कधी कधी तर गाडीवर मदतनीस नसतो बर का?

# शॉटसर्किटमुळे लागलेल्या आगीत व्यावसायिकाचे १८ कुलर जळाले

## जवळच उभ्या नॅनो कारला ही झळ, बुरुडगाव रोडवरील घटना

नगर - शॉटसर्किटमुळे लागलेल्या आगीत व्यावसायिकाने घराच्या पाठीमागील बाजूस ठेवलेले १८ नवीन कुलर जळून खाक झाले असून त्या ठिकाणी असलेल्या टाटा कंपनीच्या नॅनो कारला ही आगीची झळ बसून नुकसान झाल्याची घटना बुरुडगाव रोड येथे घडली.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, सुजय दिनेश गांधी (वय ३५, रा. नवल बंगला, वाघ नर्सिंग होमसमोर, बुरुडगाव रोड) यांचा कूलरचा व्यवसाय असुन त्यांच्याकडे सिंफनी कंपनीची एजन्सी असल्याने त्यांच्या दुकानात व घरी कुलर ठेवलेले असतात. ३० डिसेंबरला गांधी यांच्या दुकानात ७० लीटरचे कुलर घेवुन जायचे असल्याने ते १८ कुलर घराचे मागील बाजुस बाहेर काढून ठेवले होते. त्यानंतर रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास गांधी यांना त्यांची बहीण पुर्वा हिचा फोन आला व तिने सांगितले की 'घराचे मागील बाजुस आग लागली आहे'. गांधी यांनी लगेच घरी जावुन पाहिले असता त्यांच्या नॅनो गाडीला व शेजारी असलेल्या कुलरला आग लागली होती.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर महापालिकेच्या अग्निशामक दलाची गाडी आली व त्यांनी गाडीला व कुलरला लागलेली आग विझवली. आग विझल्यानंतर पाहिले तेव्हा टाटा कंपनीची नॅनो कारचा पुढील भाग हा पुर्णपणे जळून त्यात बोनेट, इंजिन, स्टेरिंग, ग्लास, हेड लाईटचे नुकसान झालेले होते. तसेच बाजुला ठेवलेले १८ कुलर पुर्णपणे जळून खाक झाले होते.

शॉट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी सुजय गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार जळीताची नोंद केली आहे.




सातवे पुण्यस्मरण
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..
भावपूर्ण श्रद्धांजली!
कै. इंदुबाई मारुतीराव ससे
स्वर्गवास : ०१/०१/२०१८
दुःखांकित :
समस्त ससे परिवार
दामोदर बिर्याणी हाऊस
हॉटेल ओबेरॉय परमिट रुम व बियरबार



एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
प्रिमियम मसाला अगरबत्ती
इंडियन कस्तुरी
Indian Kasturi
तसेच केशरचंदन, शाहीऊद, हिना कस्तुरी, महालक्ष्मी, कस्तुरी दन अगरबत्ती व धुप
शुभलाभ (६ इन १ पाऊच १२० ग्रॅम रु. ६५ चा ५० मध्ये
तसेच-डिओ, कापुर, शेंदूर, अत्तरे, धुप व अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
आडते बाजार, हॉटेल रसरंग समोर, अ.नगर



SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



Career Disha
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY
MS-OFFICE TALLY PRIME GST CORELDRAW ILLUSTRATOR PHOTOSHOP WEB PAGE DESIGNING BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769



आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
* मोफत ॲन्जीओप्लास्टी
* माफत डायलेसीस/किडनी विकार
* माफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनेग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
* शिबीरस्थळ *
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001
टिप : नांव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.





दशक्रिया विधी
स्व. सौ. सविता कृष्णा फल्ले
स्वर्गवास दि. २४/१२/२०२४
अंगणात पळायला शिकवले आम्हांला, अंधारातुन प्रकाश बघायला शिकविले आम्हाला,
हवं ते सगळं काही दिलं आम्हाला, पण दुर का सोडुन गेलात आम्हाला...
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली!
दशक्रिया विधी - गुरुवार दि. २/१/२०२५ रोजी
सकाळी ८.०० वा. शुक्लेश्वर मंदिराजवळ, भिंगार, अमरधाम येथे होईल.
* दुःखांकित *
कृष्णा दामोधर फल्ले (पती) | विजय दामोधर फल्ले (दीर)
रवि कृष्णा फल्ले (मुलगा) | वदंना नितीन जाधव (मुलगी)
निलेश कृष्णा फल्ले (मुलगा) | रुपेश विजय फल्ले (पुतण्या)
मनिषा दिनेश दहितुले (मुलगी) | मंजुश्री प्रशांत कर्डिले (पुतणी)
समस्त फल्ले परिवार
पाटील गल्ली, भिंगार
साई सप्लायर्स
महेशभाऊ झोडगे मित्र परिवार
ह.भ.प. अक्षय महाराज उगले यांचे प्रवचन होईल.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## वाढती व्यापारी तूट - धोकादायक




सध्या भारताची थेट विदेशी भांडवल गुंतवणूक १००० अब्ज ट्रिलियन अमेरिकन डॉलर झाली असून सामान्यतः जीडीपी म्हणजेच विकास दर जगात सर्वात अधिक (साधारण ६ ते ७%) आहे. या गोष्टी दिलासादायक असल्या तरी नोव्हेंबरमध्ये वाढलेली आयात व व्यापार तूट अत्यंत चिंताजनक, धोकादायक पातळीवर आली आहे.

वाढती व्यापारी तूटला एक सर्वात मोठा घटक म्हणजे सोने! आपला देश जगातील सर्वाधिक सोने आयात करणारा देश आहे. एकीकडे व्यापारी मालाची निर्यात ३२११ कोटी डॉलर असताना आयात मात्र तब्बल ७००० कोटीपर्यंत वाढल्याने नोव्हेंबहर २४ ची व्यापारी तूट ३८०० कोटी डॉलरपर्यंत वाढली आहे.

वास्तविक सोने आयातीवर १५% वरून ६% आयात कर कमी करण्याची खरंच गरज होती का? सोने जागतिक अशांतेत सुरक्षित व महत्त्वाचे आहे तरीपण सर्वसामान्य, रोजगार, उत्पादन क्षमता इ.च्या दृष्टीने ते प्रभावी नसून उच्चवर्गीयांच्या फायद्याचे वाटते.



२०२४ च्या पहिल्या ७ महिन्यात एकूण निर्यात (YOY) २% वाढली असली तरी आयात मात्र ८% इतकी मोठी झाली आहे. आंतरराष्ट्रीय संदर्भीय संस्था व्यापारी तूट गंभीरतेने घेत असतात. एकीकडे रुपयांतून काही देशांशी व्यवहार होत असला तरी या तुटीमुळे डॉलरच्या तुलनेत रुपया घसरतच आहे.

तात्पर्य, अनावश्यक आयातीला कमी करण्याचा प्रयत्न, देशांतर्गत उत्पादन, सर्वसमावेश उपोययोजना करून व्यापारी तूट घटवणे अत्यंत गरजेचे ठरेल.

# महानगरपालिकेचे शनिवारपासून स्वच्छता अभियान सुरू

### दर शनिवारी अधिकारी, कर्मचारी राबवणार अभियान; नागरिक, सामाजिक संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन

नगर - महानगरपालिकेचे शहर स्वच्छता अभियान शनिवारपासून (दि.४) सुरू होत आहे. दर शनिवारी शहराच्या एकेका भागात अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार आहेत. शहरातील नागरिक, सामाजिक संघटनांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

नव्या वर्षात शहर स्वच्छतेसाठी महानगरपालिकेने संकल्प केला आहे. अहिल्यानगर शहर स्वच्छ शहर म्हणून ओळखले जावे, यासाठी नागरिक, सामाजिक संघटनांच्या सहकार्यातून, सहभागातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. प्रत्येक शनिवारी शहर व उपनगराच्या एकेका भागात हे अभियान राबविण्यात येणार आहे. ४ जानेवारी रोजी स्टेट बँक चौक ते चाँदणी चौक दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या भागात अतिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली होती. यात या रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे हटविली होती. त्यामुळे या भागात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. नागरिक, सामाजिक संघटनेने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

# ड्रेनेज लाईन चोकअप झाल्याने दुर्गंधीयुक्त घाण पाणी रस्त्यावर

### परिसरातील नागरिक आरोग्याच्या समस्यांनी त्रस्त, मनपाने दखल घेण्याची मागणी

नगर - ड्रेनेज लाईन ब्लॉक झाल्याने गेल्या १५ ते २० दिवसापासून सांडपाणी मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर वाहत आहे. रस्त्यावर साठलेल्या सांडपाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर या भागातील नागरिकांना अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ड्रेनेजची दुरुस्ती करून या भागात धूर फवारणी व औषध फवारणी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्याक विभागचे शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांनी केली आहे.



झेंडीगेट परिसरात ड्रेनेज लाईन चोकअप झाल्याने दुर्गंधीयुक्त घाण पाणी रस्त्यावर पसरले आहे.

प्रभाग क्र. ११ मध्ये झेंडीगेट, बाबा बंगाली भाग हा मोठा परिसर आहे. या भागात कारी मस्जिद समोर साठलेल्या सांडपाण्यामुळे मोठी दुर्गंधी पसरली आहे. या दुर्गंधीमुळे मोठ्या प्रमाणावर डासांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे येथील अनेक लहान मुलांना, ज्येष्ठांना व नागरिकांना डेंगू, मलेरिया, टायफाईडसारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. या ड्रेनेजच्या सांडपाण्यामुळे नागरिकांना पायी चालणेही मुश्किल झाले आहे. या भागात अनेक धार्मिक स्थळ असल्याने त्या धार्मिक स्थळाकडे प्रार्थना करण्यासाठी नागरिकांना येणे-जाणेही अवघड झाले आहे. विशेष बाब म्हणजे महानगरपालिकेच्या प्रभाग झोन क्र. ३चे कार्यालय या ठिकाणावरून काही अंतरावरच आहे तरीही या समस्येकडे दुर्लक्ष केले जात आहे. नागरिकांनी याच भागात राहणाऱ्या लोकप्रतिनिधींना सांगूनही दुर्लक्ष केले गेले आहे. महापालिका कर्मचाऱ्यांना देखील येथील स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संपर्क केला. तरी पण अजून त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. आयुक्त व महापालिका प्रशासनाने काळजीपूर्वक त्वरित दखल घेऊन दुरुस्ती करण्यात यावी व या भागातील नागरिकांना समस्यांपासून वाचवावे, अशी मागणी जरीवाला यांनी केली आहे.

# शेतातील पिकांचे नुकसानीबाबत गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ

### शेतकऱ्याचे पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु

नगर - कुळ म्हणून शेतजमिनीचे वहिवाट करणाऱ्या शेतकऱ्याच्या शेत पिकाचे जमिनीचे मूळ मालकाचे वारसदार यांनी नुकसान करून जागेवर ताबा मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून घेण्यास पोलिसांनी नकार दिल्याने शेतकऱ्याने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय समोर बुधवारी (दि.१) सकाळपासून आमरण उपोषण सुरू केले.




शेती पिकाचे नुकसानीबाबत गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याच्या निषेधार्थ पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करताना शेतकरी भानुदास पवार व शरद पवार.

याबाबतची माहिती अशी की शरद भानुदास पवार (रा. राळेगण म्हसोबा, ता.नगर) यांचे वडील भानुदास पवार हे त्यांच्या पूर्वजापासून शेत जमिनीत मशागत करतात.

पिकांचे नुकसान झाल्यानंतर पवार हे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याकरता गेले असता नगर तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे मूळ मालक व त्यांच्या नातेवाईकांनी आतापर्यंत भानुदास पवार यांचे चार ते पाच लाख रुपयाचे नुकसान केले.

याबाबत शरद पवार हे नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याकरिता गेले असता स.पो.नि. प्रल्हाद गीते यांनी त्यांचे काही एक ऐकून न घेता तू माझ्याकडे येऊ नकोस असे म्हणून गुन्हा दाखल करण्यास नकार दिला. यामुळे शरद पवार यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदन देऊन संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली तसेच नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो. नि. प्रल्हाद गिते यांच्या या गैरवर्तनाबाबत त्यांची खाते न्याय चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# नगरमध्ये २ दिवसांत सार्वजनिक ठिकाणी चक्कर येवून पडल्याने दोघांचा दुर्दैवी मृत्यू

नगर - नगर शहर परिसरात गेल्या २ दिवसांत दोघांचा सार्वजनिक ठिकाणी चक्कर येवून पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यातील एक घटना सोमवारी (दि.३०) रात्री भिंगार मधील शुक्लेश्वर मंदिर परिसरात तर दुसरी घटना मंगळवारी (दि.३१) दुपारी शहरातील शनीचौक परिसरात एका पुस्तकाच्या दुकानासमोर रस्त्यावर घडली. या दोन्ही घटनांबाबत पोलिसांनी आकस्मात मृत्युच्या नोंदी केल्या आहेत.

पहिल्या घटनेत कैलास पोपटराव कलमदाने (वय ५०, रा. संकल्प कॉलनी, बुऱ्हाणनगर) हे सोमवारी सायंकाळी ७ च्या सुमारास भिंगार मधील शुक्लेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेले असता त्यांना अचानक चक्कर येवून ते खाली पडले. त्यांना त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने उपचारासाठी नगरमधील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तशी खबर भिंगार कॅम्प पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी बीएनएस २०२३ चे कलम १९४ प्रमाणे आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

दुसरी घटना मंगळवारी (दि.३१) दुपारी २.३० च्या सुमारास नगर शहरातील शनीचौक परिसरात एका पुस्तकाच्या दुकानासमोर रस्त्यावर घडली. या घटनेत एक अंदाजे ६० वर्षीय अनोळखी इसम रस्त्याने जात असताना प्रभाकर पुस्तकालयाच्या समोर त्यास चक्कर आली आणि तो खाली पडला. त्याला आजूबाजूच्या नागरिकांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांनी उपचारापूर्वीच मयत घोषित केले. तशी खबर कोतवाली पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी बीएनएस २०२३ चे कलम १९४ प्रमाणे आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# पे ॲण्ड पार्क योजना मनपाने तत्काळ रद्द करावी अन्यथा 'आंदोलन' करणार : शिवसेनेचा इशारा

नगर - शहरातील विविध ठिकाणी पे अँड पार्क योजनेची अंबलबजावणीची घोषणा अहिल्यानगर महानगरपालिकेने केली आहे. यामध्ये शहराच्या मुख्य मध्यवर्ती बाजारपेठेसह उपनगरातील प्रमुख रहदारीचे रस्ते, जागा यांचा समावेश आहे. प्रत्येक्षात शहरातील नागरिक हा महागाईने त्रस्त आहे व नगरकरांनी कोट्यावधीचा कर भरुन देखील कोणतीही मुलभूत सुविधा नागरिकांना मनपा व्यवस्थित देत नाही. असे असताना नविन योजनेची अंबलबजावणी करुन नगरकरांना लुटण्याचा घाट मनपा घालत आहे. मनपाने ही योजना त्वरीत मागे घ्यावी व मनपाकडे स्वमालकीचे भूखंड बाजारपेठेलगत असलेल्या जागेत वाहनतळ निमार्ण करुन नगरकरांना सुविधा उपलब्ध करुन द्याव्या, अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाच्या वतीने मनपा उपायुक्त यांना देऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महानगरपालिकेची पे अँड पार्किंग योजनेसंदर्भात मनपा उपायुक्त यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, युवा सेनेचे विक्रम राठोड, दत्ता जाधव, संतोष गेनपा, दत्ता कावरे, रावजी नांगरे, योगिराज गाडे, प्रशांत गायकवाड, रविंद्र वाकळे, सचिन शिंदे, विशाल गायकवाड आदी उपस्थित होते

नागरिकांचा महानगरपालिकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा व ही योजना त्वरीत रद्द करावी अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल.

## मधुकर ससे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रहिवासी मधुकर सुखदेव ससे (वय ७९, रा.माळगल्ली, शुक्लेश्वर कॉलनी, भिंगार) यांचे ३१ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर १ जानेवारीला अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष ससे यांचे ते वडील होत.

## संजय रांका यांचे हृदयविकाराने निधन

नगर - येथील संजय ताराचंद रांका (वय ५६, रा.चिचोंली कोल्हार) यांचे ३१ डिसेंबर रोजी हृदयविकाराने ओसिया (राजस्थान) येथे निधन झाले. त्यांच्यावर १ जानेवारी रोजी चिंचोली अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे आई, पत्नी, १ भाऊ, २ बहिणी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विजय रांका यांचे ते धाकटे बंधू तर सौरभ, शुभम यांचे वडील तसेच मयुर रांका यांचे ते चुलते होत.

## श्रीमती बनाबाई बोरकर यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील श्रीमती बनाबाई खंडू बोरकर (वय ९५) यांचे ३१ डिसेंबर रोजी रात्री ९ वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर न.प.चे सेवानिवृत्त कर्मचारी बाबू बोरकर व लोकमान्य टिळक वाचनालयातील कर्मचारी राजेंद्र बोरकर यांच्या मातोश्री, न.प.चे कर्मचारी संदिप बोरकर, प्रॉपर्टी डिलर सचिन बोरकर, राहुल बोरकर व शुभम बोरकर यांच्या आजी होत



नववर्षानिमित्त ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे भाविकांनी सकाळपासून दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती

# माळीवाडा बसस्थानकातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर - शहरातील माळीवाडा बस स्थानक परिसरातून अज्ञात व्यक्तीने मजुरी काम करणाऱ्या महिलेच्या अल्पवयीन मुलीला (वय १५) फूस लावून पळवून नेल्याची घटना मंगळवारी (दि.३१) दुपारी ३.४५ च्या सुमारास घडली.

या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने रात्री कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी या मुळच्या बुलढाणा जिल्ह्यातील असून मजुरी कामासाठी अहिल्यानगर शहरात रेल्वेस्टेशन परिसरात राहतात. मंगळवारी त्यांना श्रीगोंदा येथे मजुरी कामासाठी जायचे असल्याने त्या त्यांच्या अल्पवयीन मुलीसोबत रेल्वेस्टेशन येथून रिक्षाने माळीवाडा बस स्थानक परिसरात आल्या. तेथे श्रीगोंदा येथे जाणाऱ्या बसचा शोध घेत असताना त्यांच्या रखवालीतून अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून पळवून नेले. दरम्यान, फिर्यादी यांनी मुलीचा परिसरात शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यामुळे त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.

# गांजा ओढण्यास मज्जाव केल्याने चॉपर व कोयत्याने वार

### एका महिलेसह चौघांवर गुन्हा दाखल

नगर - इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी गांजा ओढण्यास मज्जाव केल्याने वॉचमन वर चॉपर व कोयत्याने वार करत त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना बोल्हेगाव परिसरात सुरु असलेल्या एका बांधकाम साईटवर सोमवारी (दि.३०) रात्री घडली. करण संतोष कदम (वय १९, रा. टाकळी खातगाव, ता.नगर) असे जखमी वॉचमनचे नाव आहे.

त्याने दवाखान्यात उपचार घेत असताना तोफखाना पोलिसांना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी मंगळवारी (दि.३१) रात्री एका अनोळखी महिलेसह चौघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. राहुल साबळे, यश शिरसाठ, बबन पाटोळे व एक अनोळखी महिला (सर्व रा. गांधीनगर, बोल्हेगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. बोल्हेगाव परिसरातील नायरा पेट्रोलपंपासमोर भंडारी कंन्स्ट्रक्शन यांची बांधकाम साईट सुरु आहे. या ठिकाणी करण कदम हा वॉचमन म्हणून काम करतो. तो सोमवारी रात्री साईटवर जेवण करत असताना त्याच्या कडे २ अनोळखी इसम व १ महिला आली. ते त्यास म्हणाले की आम्हाला गांजा प्यायचा आहे, आम्हाला पाणी दे. त्यावेळी करण त्यांना म्हणाला तुम्ही येथे गांजा पिवू नका इथून निघून जा. या बोलण्याचा त्यांना राग आला व त्यांनी शिवीगाळ करत वाद सुरु केला. त्यातील एकाने करण यास तोंडावर बुक्कीने मारले, तसेच महिलेने चापटीने मारले. त्यावेळी करण याने आरडा ओरडा केल्यावर ते तेथून मोटारसायकलवर बसून निघून गेले.

थोड्या वेळाने पुन्हा तेथे दोघे जण आले, त्यावेळी त्यांच्या सोबत त्यांचे इतर साथीदार होते. त्यांनी आल्याबरोबर करण यास शिवीगाळ सुरु करत ही प्रॉपर्टी तुझ्या बापाची आहे काय? असे म्हणत आरोपी राहुल साबळे याने करण याच्या डोक्यावर चॉपरने वार केला. यश शिरसाठ याने कोयत्याने हल्ला केला तर बबन पाटोळे याने दगडाने मारहाण करत जखमी केले. यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या अनोळखी महिलेने शिवीगाळ करत चापटीने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक लोणारे हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### केळी खा, लाभ मिळवा

केळी हे एक फळ आहे जे केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. केळ्यामध्ये असलेले पोटॅशियम सिडिटी कमी करण्यास मदत करते. हे पोटातील ऍसिडचे उत्पादन नियंत्रित करते आणि गॅस, अपचन आणि छातीत जळजळ यापासून आराम देते.

## पाककला

### खरवसाचे धिरडे

**साहित्य :** खरवसाचे दूध, ओल्या मिरच्या, कोथिंबीर, कांदा, मीठ, तूप, थोडीशी कणीक

**कृती :** खरवसाचे दूध चार वाट्या घ्यावे. त्यात अर्धी वाटी कणीक आणि चवीपुरते मीठ घालावे व सर्व चांगले कालवावे. नंतर कांदा व ओल्या मिरच्या बारिक चिरुन घालाव्यात व कोथिंबीर घालावी. नंतर सर्व एकत्र कालवून, एकजीव करुन घ्यावे व तव्यावर तूप सोडून, त्यावर वरील मिश्रण घालून धिरड्यासारखे परतून काढावे. चिटणी बरोबर किंवा सॉसबरोबर सर्व्ह करावे.

## वास्तू

### आर्थिक स्थिती मजबूत होण्यासाठी

पूर्व दिशा ही सूर्यदेवाची दिशा आहे आणि पिवळा रंग सूर्यदेवाचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे पिवळ्या रंगाच्या वस्तू पूर्व दिशेला ठेवल्याने सूर्यदेवाची कृपा होते आणि घरात सकारात्मक ऊर्जा येते. पिवळा रंग देखील संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. पिवळ्या रंगाच्या वस्तू पूर्व दिशेला ठेवल्याने घरात धनसंपत्ती येते आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती मजबूत होते.

## सल्ला

घरात पाल हा प्राणी नको असल्यास कपाटात, दारांच्या फटीत मोरपिसे ठेवा अथवा चिकटवा याला घाबरुन पाल पळून जाईल.

## सौंदर्य

सुरकुत्या दूर करण्यासाठी तुम्ही तिळाचे तेल वापरू शकता. यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात, जे सुरकुत्या दूर करण्यास मदत करतात. तसेच, तुम्ही तिळाच्या तेलात मिसळून मुलतानी माती वापरू शकता. हा पॅक ३० मिनिटांसाठी लावा.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, श्रवण २३।११, सूर्योदय ०६ वा. ३६ मि. सूर्यास्त ०६ वा. ०० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**मिथुन** : ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**कर्क** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळा.

**सिंह** : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध कराल. मातृचिंता सतावेल.

**तूळ** : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

**वृश्चिक** : सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल.

**धनु** : हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. आपल्या बोलण्या मुळे कोणाला तरी संताप येईल.

**मकर** : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू राहतील.

**कुंभ** : आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

**मीन** : आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. इतरांसमोर आपले विचार मांडाल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टरांचा बारा वर्षांचा मुलगा त्याच्या मित्राबरोबर दवाखान्यात खेळत होता. डॉक्टरांच्या तपासणी खोली शेजारील खोलीत हाडांचा सांगाळा होता. मुलाच्या मित्राने विचारले, ''हे काय आहे?'' डॉक्टरांचा मुलगा म्हणाला, ''तो माझ्या वडिलांचा पहिला रुग्ण आहे.''


# जागतिक आश्चर्ये

## अॅप्पल स्टोअर

हे स्टोअर ९.७५ मिटर उंच अशी काचेची बिल्डींग आहे. या बिल्डींगचा आकार वाटोळा आहे. या बिल्डींगमधील जीना सुद्धा काचेपासून बनविलेला आहे. इतर स्टोअरपेक्षा हे स्टोअर त्याच्या नाविन्यपूर्ण डिझाईनमुळे अप्रतिम म्हणून गणले जाते.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०८४ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) गावचा मुख्य अधिकारी ४) जंगलात होणाऱ्या फुलांची पायापर्यंत लोंबणारी माळ ७) नव्वद अंशाचा कोन ९) स्वाक्षरी; सिग्नेचर १०) जकात वसुलीची जागा; अनेक रस्ते एकत्र येतात ते ठिकाण ११) ताटापेक्षा थोडे मोठे असे पसरट पात्र १३) आवश्यकता; नड; जरुरी १५) अटीची भाषा १८) मोठी नदी २०) स्वभावसिद्ध; नैसर्गिक; उद्देशावाचून २१) मोबदला घेऊन घरकाम करणारी स्त्री २३) ऐट; तोरा; शान; डामडौल २४) मौजेखातर केलेला प्रवास; टूर २६) जो कारखाना चालवितो तो

**शब्दगंध क्र. ७०८३ चे उत्तर**



**उभे शब्द :-** २) गुणदोषांचे विवेचन करणारा; टीका करणारा ३) गुंतागुंत ४) जंगलाचा राजा, सिंह ५) माहे; महिना; माह ६) भाजून फुलविलेला धान्याचा दाणा ८) राग; त्वेष; झोपडे १०) एक सुगंधी वनस्पती १२) एक हिंस्र जंगली प्राणी १४) बाप; वडील; सीतेचे वडील १६) समेट; सलोखा; साम १७) तीन गुणांपैकी एक; धूळ १९) डोंगरातील खोलगट लांबट जागा २२) खोटा; रिकामा; निरर्थक २४) नेहमी; हमेशा २५) प्रत्येक; दर; शंकर; महादेव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

: संकलक :
अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : 'विचार' असे मांडा की तुमच्या विचारांवर कोणीतरी 'विचार' केलाच पाहिजे.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## मोबाईलचा शोध कोणी लावला?

भ्रमणध्वनी हे एक इलेक्ट्रॉनिक्स उपकरण (यंत्र) असून याचा दूरसंचारासाठी उपयोग केला जातो. याला इंग्रजीमध्ये मोबाईल फोन (मोबाईल) किंवा सेल्युलर फोन (सेल फोन) असे म्हणतात. भ्रमणध्वनीच्या साहाय्याने संभाषणाची व माहितीची देवाणघेवाण करता येते. पारंपरिक दूरध्वनी उपकरणे घरामध्ये एकाच जागी ठेवून वापरावी लागतात. जगातील पहिला मोबाईल फोन मोटोरोला कंपनीच्या मार्टिन कूपर ह्या व्यक्तीने १९७३ साली विकसित केला व वापरून दाखवला. १९९० साली जगभरात १.२४ कोटी मोबाईल फोन वापरकर्ते होते. २००९ सालाअखेरीस हा आकडा ४.६ अब्ज इतका आहे. सध्या विकसित देशांमधील १०० व्यक्तींपैकी ९७ तर जगातील १०० व्यक्तींपैकी ४५ व्यक्ती मोबाईल फोन वापरतात. मार्टी कूपर आणि त्यांच्या अभियंत्यांच्या कार्यसंघाने मोटोरोलामध्ये १५ वर्षे सेल्युलर फोन आणि त्याबरोबर जाणारे स्विचिंग उपकरणे विकसित केली.

३ एप्रिल १९७३ रोजी त्यांनी पहिला सेल्युलर कॉल केला. मोटोरोलाने ताबडतोब संपूर्ण सेल्युलर बाजार ताब्यात घेतला आणि बऱ्याच वर्षांपर्यंत ९०% बाजारपेठ राखली. परंतु त्यांची सिस्टम एनालॉग होती आणि फोन मोठे होते. जेव्हा डिजिटल क्रांती उत्तरार्धात आली तेव्हा '९०' च्या मोटोरोलाने आपली बाजारपेठेवरील पकड गमावली. त्यांच्याकडे बाजारासाठी डिजिटल फोन तयार नाही. त्यांचा बाजारपेठेतील मोठा हिस्सा गमावला.

## हुशार ससा

सशाचे बोलणे ऐकून सिंहाला खूप राग आला आणि तो पुन्हा पुन्हा गर्जना करू लागला. त्याच्या भयंकर गर्जनेने संपूर्ण जंगल हादरू लागले. त्या मूर्खाचा ठावठिकाणा मला लगेच सांग, सिंह गर्जना करत म्हणाला, मी त्याला मारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. खूप छान साहेब ससा म्हणाला, फक्त मरण. ही त्या दुष्ट माणसाची शिक्षा आहे. जर मी आणि बलवान झालो असतो तर मी त्याचे तुकडे केले असते.

चल, मला रस्ता दाखव, सिंह म्हणाला, लगेच सांग कुठे जायचे?

महाराज, इकडे या, सशाने रस्ता दाखवला आणि सिंहाला एका विहिरीजवळ नेले आणि म्हणाला, महाराज, तो दुष्ट सिंह जमिनीखाली किल्ल्यात राहतो. फक्त काळजी घ्या. किल्ल्यात लपलेला शत्रू धोकादायक आहे.

मी त्याच्याशी सामना करेन, सिंह म्हणाला, तू मला सांग तो कुठे आहे ?

मी त्याला आधी पाहिले तेव्हा तो इथे बाहेर उभा होता. तुला येताना पाहून तो किल्ल्यात शिरला असे दिसते. चल मी तुला दाखवतो.


ससा विहिरीजवळ आला आणि सिंहाला आत बघायला सांगितले. सिंहाने विहिरीच्या आत पाहिल्यावर त्याला त्याचे प्रतिबिंब विहिरीच्या पाण्यात दिसले.

सावली पाहून सिंह जोरात गर्जना करू लागला. विहिरीच्या आतून येणाऱ्या आपल्याच डरकाळ्याचा प्रतिध्वनी ऐकून दुसरा सिंहही गर्जना करत आहे असे त्याला वाटले. शत्रूला ताबडतोब मारण्याच्या इराद्याने त्याने लगेच विहिरीत उडी घेतली. उडी मारताच तो आधी विहिरीच्या भिंतीवर आदळला, नंतर जोरात पाण्यात पडला आणि बुडून त्याचा मृत्यू झाला. अशाप्रकारे चतुराईने सिंहापासून सुटका करून घेतल्यानंतर छोटा ससा घरी परतला. त्याने जंगलातील प्राण्यांना सिंह मारल्याची कहाणी सांगितली. शत्रू मारल्याच्या बातमीने संपूर्ण जंगलात आनंद पसरला. जंगलातील सर्व प्राणी सशाचा जयजयकार करू लागले.

तात्पर्य : समजूतदारपणाने आणि हुशारीने काम करून आपण भयंकर संकटावर मात करू शकतो आणि सर्वात शक्तिशाली शत्रूचाही पराभव करू शकतो.

(पूर्ण)

# रहमते दर्शन (भाग - १)



महाराज जी ने अपने सुन्दर वचनों से निहाल करते हुए मुझे यह वचन फ़रमाये, चिंता न करो, अभी तुम्हारी उम्र बहुत लंबी है। हम गद्गद् हो उठे और महाराज जी का धन्यवाद किया और खुशी-खुशी घर लौटे। इसके बाद तो महाराज जी की दया-कृपा निसदिन मेरे संग रही। मुझे नामदान मिला। मेरा सफल ऑपरेशन हुआ और हमें पुत्र रत्न की प्राप्ति हुई। और इसके पश्चात मेरे परिवार के सभी सदस्यों को एक-एक करके महाराज जी ने नामदान की दौलत बख़्शी । यह थी कृपा परम संत दयाल पुरुष दर्शनसिंह जी महाराज की। उनकी इस दया का सिलसिला आज तक अविरल जारी है।

## निरंतर दया प्रवाह

जब महाराज कृपालसिंह जी ने चोला छोड़ा, तो मेरा मन बहुत उदास हो गया, मुझे कुछ भी नहीं सुहाता था । मैं रोता रहता था और सोचता रहता था कि अगर जीवन में जीवित गुरु नहीं है, तो गुरु के बिना जीवन बेकार है। मेरा मन भटक गया और मैंने किसी साधु-संत की तलाश शुरू कर दी। मैं किसी आदमी के साथ एक साधु के पास पहुँचा। मैं साधु को नाम से जानता था और वह मेरा परिचित भी था। मैंने अपनी व्यथा उसे सुनाई। साधु ने मुझे अपने पास रख लिया और मुझे वहाँ सेवा करने के लिए कहा गया। मुझे झूठे बर्तन माँजने की और साधु की चिलम वगैरह भरने की सेवा दी गई। मैं एक रात वहाँ ठहरा। परन्तु मन नहीं माना और साधु से आज्ञा लेकर दिल्ली चला आया। अब मैं जहाँ कहीं सत्संग होता वहाँ पर जाने लगा। २१ अगस्त के बाद मैं सावन आश्रम काफी दिन से गया नहीं था। एक रविवार के दिन मैं आश्रम में पहुँचा, तो वहाँ मुझे कुछ पुराने सेवादारों के अतिरिक्त और कोई नहीं मिला। न दरी बिछी थी, न माइक था। मैंने उनसे पूछा कि सत्संग कहाँ होता है? उस समय उनमें से एक सेवादार, जिन्हें हम पंडित जी कह कर बुलाते थे, एक चारपाई पर किताबें सजा रहे थे। वे मुझ पर बरस पड़े और बोले, सत्संग में कभी आता नहीं है और पूछता है कि सत्संग कहाँ होता है? तिलक नगर जाकर महाराज जी का सत्संग सुन। मैं आश्रम से बाहर आया और मुड़कर देखा तो पाया कि न वहाँ पंडित जी थे, न वे किताबें थीं। अब दिल ने फैसला किया कि घर बैठा जाये, गुरु जहाँ कहीं भी होगा, ज़रूर अपना पता देगा। मैं घर पर आकर बैठ गया परन्तु मेरा दिल उचाट रहता था। एक दिन अचानक मैंने एक दोहा पढ़ा, दया करे, तो सतुर मेले। ऐसा लगा जैसे वह आवाज़ तिलक नगर की तरफ से आ रही है और मैंने ठान लिया कि मैं तिलक नगर ज़रूर जाऊँगा। एक दिन रविवार को मैं पूछता-पूछता तिलक नगर सत्संग में पहुँचा। वहाँ सत्संगी भाइयों से मिला। मैंने सुना हुआ था कि गुरु के शरीर से चमेली की खुश्बू आती है। मैं संत दर्शनसिंह जी महाराज के समीप पहुँचा और मुझे वास्तव में चमेली की खुशबू आई । एक बार मैं अपने गुरु की याद में उदास बैठा हुआ था। महाराज संत दर्शनसिंह जी मेरे सामने प्रकट हुए और मेरे हाथ में एक सत्-संदेश की कापी दी और बोले, इसे देखो।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

### अद्भुत अनुभव

# अंतरिक बल (भाग - २)

आप का जिस पर भी विश्वास है, सोचा करो सारा संसार उस जैसा बन जाएगा। अगर आप को किसी पर विश्वास नहीं है और आप को अपने पर विश्वास है तो मन में सोचो सारा संसार मेरे जैसा ईमानदार बन जायेगा। शिव बाबा या इष्ट प्यार के सागर हैं, यह विश्वास रखो सारा संसार बाबा या इष्ट जैसा प्यार का सागर बन जाएगा।

हम नई पुरानी समस्याओ का हल चाहते हैं। बेहतर कल के लिये बेहतर विश्वास की जरूरत है। सकारात्मक परिणामों के लिये विश्वास की जरूरत होती है। अगर आप को खुद पर विश्वास नहीं है तो सफलता नहीं मिलेगी। अगर आप को दूसरों पर विश्वास नहीं है तो उन से सदा भयभीत रहेंगे। अगर दूसरों पर विश्वास नहीं तो सदा शंकालु रहेंगे। शक करीबी सम्बन्धों में जहर घोल देता है। हमारे सभी म हत्वपूर्ण संबन्ध विश्वास पर टिके हुए हैं। अगर समाज पर विश्वास नहीं तो अंतहीन कलह बना रहेगा। अगर एक दूसरे पर विश्वास है तो समाज में सहयोग और परोपकार की भावना बनी रहेगी। विश्वास वह जादू है जो बीजों को फूल में बदल देता है। विश्वास विचारों तथा सपनों को हकीकत में बदल देता है। चाहे आप का मकसद संसार को बदलना हो या सिर्फ अपनी खुद की परिस्थितियों को बेहतर बनाना हो, विश्वास एक मुख्य भूमिका निभाता है। विश्वास आप को एक ऐसी शक्ति के संपर्क में पंहुचा देता है, जो आप से परे है, चाहे आप धार्मिक हों या न हों। जब आप किसी खास मार्ग पर चलते हैं तो आप के पैर डगमगा सकते हैं, क्योंकि आप अब भी कुछ हद तक ऐसे डर के बोझ तले दबे हैं, जो उन परिस्थितियों में सही नजर आते हैं। विश्वास उन चीजो के लिये चुंबक है जो सकारात्मक हैं और उत्पादक प्रकृति की हैं।

हम प्रतिदिन विश्वास को कार्य में लाते हैं। हम डाक्टर से दवाई लेते हैं क्योंकि उस पर विश्वास करते हैं कि ठीक हो जाएंगे। हम किसी यात्रा पर जाते हैं, हम विश्वास करते हैं कि ड्राईवर हमें हमारे गंतव्य पर पहुंचाएंगा। लोगों की आदत होती है वह जिस पर विश्वास करेंगें, आंख मूद कर विश्वास करेंगें। जिस पर विश्वास नहीं होता उसका अपमान करते रहेगें। धार्मिक लोग, आपने आराध्य पर विश्वास करेंगें, दूसरों के आराध्य की निंदा करेंगें। परमपिता परमात्मा के बिंदू रूप को याद करते रहें आप के सामने चाहे कैसा भी विघ्न आये आप का कल्याण ही होगा। दिमाग और विश्वास शक्ति

स्वंय पर विश्वास करना एक शक्तिशाली यंत्र है। लाठी, तलवार, बंदूक, बाम्ब, एटम बाम्ब से हम अपने शरीर, परिवार व देश की रक्षा करते हैं। विश्वास से हम अपनी आत्मा, सभी मनुष्य आत्माओं, दूसरी जीव आत्माओं और प्रकृति की रक्षा करते हैं। कोई भी आप को हिपनोटाईज नहीं कर सकता। लोग हिपनोटाईज तब होते हैं जब वह हिपनोटिसट पर पूर्ण विश्वास करते हैं। मस्तिष्क वही करता है जो कहा जाए। बीमारियां मन में समाए हुए गंदे विचारों का बाहरी रूप है। अच्छे विचारों से गंदे विचारों की सफाई हो जाती है। विश्वास से मस्तिष्क उत्तम कार्य करता है। जो सुखी है, संतुष्ट है या ऐसी एक्टिंग करते हैं उसकी उम्र अधिक हो जाती है। युद्ध व अकालों में जिनका स्वंय पर और भगवान पर विश्वास रहता है उनके बचने की संभावना अधिक होती है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

### दिमाग की शक्ती

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

२) मोकळ्या हवेत १० ते १५ मिनिटे चालण्याचा व्यायाम करावा. ३) डॉक्टरांच्या सल्ल्याने तसेच आम्ही सांगितलेल्या योगासने प्रकरणातील योगासने करून स्नायू मजबूत व लवचीक करावेत.

**आयर्वेदिक औषधी उपाययोजना :** प्रवाळ, कपर्दिक, शंखभस्म हे दधातन तसेच शतावरीकल्प दूधातून घ्यावे. आयुर्वेदिक औषधांनी युक्त वेदनाशामक हलक्या हाताने पाठीला व कमरेला मसाज करावा. पायाला गोळे येणे : कॅल्शियम व व्हिटॅमिन ई च्या कमतरतेमुळे तसेच पाया शिरांवर गर्भाशयाचा ताण पडल्याने हा त्रास जाणवतो.

**उपाययोजना :** झोपताना पायाखाली उशी घेऊन झोपावे; त्यामुळे पायांना आराम मिळतो.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना :** डॉक्टरांच्या सल्ल्याने तसेच आम्ही सांगितलेल्या योगासने प्रकरणातील योगासने करावीत. २) दुर्वांकुर पेनकिलर ऑईल पायांना लावून हलक्या हाताने मसाज करावा. ३) प्रवाळ, कपर्दिक, शंखभस्म हे दूधातून घ्यावे. शतावरीकल्प दूधातून घ्यावे. ४) व्हिटॅमिन ई मिळण्यासाठी गव्हांकूर रस आठवडाभर रोज १ ग्लास घ्यावा. ६) सर्दी, खोकला, घसा दुखणे : सर्दी, खोकला, ताप, घसा दुखत असेल, तर खालील पद्धतीने आयुर्वेदिक चहा करून घ्यावा. १) २ कप पाण्यात सात ते आठ तुळशीची पाने, ७-८ गवतीचहाचे कापलेले तुकडे, १ इंच आल्याचा तुकडा व थोडा गूळ घालून १ कप होईपर्यंत आटवावे व गाळून गरम गरम प्यावे. २) मधातून सीतोपलादी चूर्णाचे चाटण करावे.

३) अडुळशाचा काढा प्यावा. एवढे करूनही बरे न वाटल्यास डॉक्टरांच्या सल्लयाने औषधोपचार करावा. ७) श्वास : दम लागणे, गर्भावस्थेच्या शेवटच्या काळामध्ये गर्भाशयाची उंची वाढल्याने त्याचा दाब फुप्फुसावर पडतो व त्यामुळे दम लागतो. तसेच शरीरामध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असेल, गर्भावस्थेमध्ये रक्तदाब वाढलेला असेल, तर गर्भवती स्त्रीला दम लागतो. अशा वेळेस गर्भवती स्त्रीला ज्या स्थितीमध्ये आराम वाटत असेल अशा सुयोग्य स्थितीत झोपवावे. शक्यतो वामंगासनामध्ये झोपावे. जर गर्भवतीला दम्याचा (तमक श्वास) त्रास तर श्वास कुठार रसवटी दोन-दोन सकाळी व संध्याकाळी घ्यावी. त्याच बरोबर मादी चूर्ण एक-एक चमचा मधातून घ्यावे. तसेच कोमट पाणी पिण्यास द्यावे व छातीवर सकाळी व रात्री कोमट तीळ तेल चोळण्यास द्यावे. पत्रमार्गामध्ये जंतूसंसर्ग: पहिल्या तीन महिन्यात गर्भाशयाचा आकार वाढल्यामुळे याचा मूत्राशयावर ताण पडतो, तर शेवटच्या तीन महिन्यात बाळाचे डोके कटी भागात उत्तरल्यामुळे मूत्राशयावर दाब पडतो.

### गर्भावस्थेतील आजार व उपचार

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



तांत्रिक अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आयोजित बैठकीत अधीक्षक अभियंता रमेश पवार यांचा सत्कार करताना सौर ऊर्जा व्यावसायिक.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कटिबद्ध होत भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सदस्य नोंदणी करावी

## आ. विक्रम पाचपुते यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर शहर भाजप सभासद नोंदणी कार्यशाळा उत्साहात



शहर भाजपच्या सदस्य नोंदणी अभियाना अंतर्गत आयोजित पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना आ.विक्रम पाचपुते.

नगर - एक काळ असा होता भाजपचा एकही आमदार जिल्ह्यात नव्हता. परंतु आज चित्र पूर्णपणे बदलले आहे. या यशाचे सर्व श्रेय फक्त पक्षाच्या कार्यकर्त्यांनाच जाते. पक्षाच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने व कार्यकर्त्याने विधानसभा निवडणूकीत भाजपच्या उमेदवाराला बळ देत निष्ठेने काम केल्यानेच जिल्ह्यात महायुतीला मोठे यश मिळाले आहे. आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागणार आहेत. यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व सर्व कार्यकर्त्यांनी कटीबद्ध होत तयारीला लागावे. प्रवाह बरोबर अनेकजण पक्षात येत असतात. जो कोणी येईल त्यासाठी दारे उघडे आहेत परंतु जो पक्ष निष्ठेने काम करतो त्यालाच संधी मिळाली पाहिजे. अहिल्यानगर शहरात २९७ बुथ आहेत. प्रत्येक बुथवर दोनशे सभासदाप्रमाणे सदस्य नोंदणी केल्यास जवळपास ६० हजार सदस्य नोंदणी अपेक्षित आहे. त्यापेक्षा जास्त सभासद नोंदणी करून उच्चांक करून दाखवू. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हात बळकट करूया, असे प्रतिपादन श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी केले.

अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्या सुरु असलेल्या सदस्य नोंदणी अभियाना अंतर्गत आयोजित पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेचे उद्घाटन आ.विक्रम पाचपुते यांनी महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने केले. पेमराज सारडा महाविद्यालायात झालेल्या या कार्यशाळेस शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, सरचिटणीस सचिन पारखी व प्रशांत मुथा, प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा.भानुदास बेरड, ज्येष्ठ नेते सुनील रामदासी, वसंत लोढा, अनिल मोहिते, महेश नामदे, दामोदर बठेजा, पंडित वाघमारे, मयूर बोचूघोळ, माजी महापौर बाळासाहेब वाकळे, बाबासाहेब सानप, अशोक गायकवाड, नितीन शेलार, राहुल जामगावकर, सुवेंद्र गांधी, बाळासाहेब गायकवाड, संजय ढोणे, धनंजय जाधव, महेश तवले, अजय चितळे, साहिल शेख, नरेंद्र कुलकर्णी, बंटी डापसे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

आ.पाचपुते पुढे म्हणाले, सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाची आज भारतातच नव्हे तर जगात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. सर्व सामान्य कार्यकर्ता हीच खरी पक्षाची ताकद असते. त्यांची ताकद मिळाल्यामुळे भाजपची आज ओळख आहे. तळागाळातील कार्यकर्ता मोठा व्हायला पाहिजे जो पक्षनिष्ठेने काम करतो, त्याला ताकद मिळाली पाहिजे, हा मूळ उद्देश सभासद नोंदणीचा आहे. पक्षाला अजून पाठबळ देण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन केले.

अभय आगरकर म्हणाले, कोणत्याही पक्षाला सत्ता टिकवायची असेल तर त्याचे संघटन बांधणी मजबूत असावी लागते. शहरात पक्षाची मोठी ताकद आहे. प्रत्येकाने जास्तीत जास्त सभासद नोंदणी स्वबळावर करावी. महाराष्ट्र हा सभासद नोंदीमध्ये देशात अग्रेसर राहील, अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. त्यांना आपल्याला पाठबळ द्यायचे आहे. यासाठी सर्व बूथ प्रमुखांनी प्रत्येक घरोघरी जाऊन हे अभियान राबवावे. याप्रसंगी सचिन पारखी, वसंत लोढा, प्रा.भानुदास बेरड, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, विवेक नाईक आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अशोक गायकवाड यांनी केले. आभार महेश नामदे यांनी मानले.

# पेपरलेस फेसलेस प्रक्रियेत सर्व स्तरांवर सुधारणांकरिता 'महावितरण' कटीबद्ध

## अधीक्षक अभियंता रमेश पवार

नगर - पंतप्रधान सूर्यघर योजनेच्या प्रसारासाठी आणि प्रचाराकरिता महावितरण आणि सोलर व्यावसायिक यांच्या संयुक्त विद्यमाने उर्जा संवर्धन रॅली काढल्याने ग्राहकांमध्ये जनजागृती होत असून महावितरण आणि सौर व्यावसायिकांची जबाबदारी वाढली असून पेपरलेस फेसलेस प्रक्रियेत सर्व स्तरांवर सुधारणा करण्यासाठी महावितरण मंडल कार्यालय कटीबद्ध असल्याचे अधीक्षक अभियंता रमेश पवार यांनी सांगितले.

सौर ऊर्जा व्यवसायिकांनी मांडलेल्या तांत्रिक अडचणींवर तोडगा काढण्यासाठी आयोजित बैठकीत रमेश पवार यांनी सांगितले की, २५००० घरांवर सोलर सिस्टीम बसवण्याचे आव्हान सर्वांनी एकत्रित येऊन पूर्ण करण्यासाठी, ज्या प्रक्रिया ग्राहक केंद्रित केल्या आहेत त्याचा स्वीकार करून लवकरात लवकर प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. ज्या अडचणी येत आहेत त्या त्वरित सोडविण्यासाठी महावितरणचे सर्व अधिकारी लक्ष घालतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी महावितरणचे शहर कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, ऑल इंडिया एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे, प्रदीप करांडे, भूषण बंग, नारायण शिरसाठ, प्रसाद तोडमल, ओम काळे, अजिंक्य जंजिरे, प्रा. विशाल शितोळे, अभिषेक कोतकर, विशाल होळकर, विलास उनवणे, नरेन मच्चा, उत्कर्ष भळगट आदी सौर व्यावसायिक उपस्थित होते.

# जाणिव फौंडेशन आयोजित शिबिरात १५३ जणांनी केले रक्तदान



रक्तदान केल्याबद्दल व्यावसायिक कैलास नवलानी यांना प्रमाणपत्र व कॅलेंडर देऊन सत्कार करतांना विकास जोशी, कैलाश दिघे, विक्रम वाडेकर, प्रदीप वाखुरे, डॉ झांबरे, विकास गायकवाड, राहुल काळे व संजय माने

नगर - रुग्णांची वाढती गरज लक्षात घेऊन सरत्या वर्षाला निरोप म्हणून जाणीव फाउंडेशन व ज़िल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने दारूच्या बाटल्या रीत्या करण्या ऐवजी रक्ताच्या पिशव्या भरुया या धर्तीवर सालाबादाप्रमाणे ३१ डिसेंबरला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. फाऊंडेशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत १५३ इच्छुक रक्तदात्यांनी नेहमीप्रमाणे रक्तदान केले. व्यावसायिक, सरकारी कर्मचारी, वाहन चालक, माजी सैनिक आदींनीही रक्तदान केले. विशेष म्हणजे या वर्षीही महिला रक्तदात्यांचा लक्षणीय सहभाग होता. कु. सावनी दिघे, कु. शिवांशी चेमटे या नवयुवतींनी तर सौ. जया वाखुरे, सौ. देवयानी दिघे, सौ. वैशाली गर्जे, सौ. मंजुषा गायकवाड व सौ. स्नेहल शेकडे या महिलांनी रक्तदान केले.

फाऊंडेशनच्या वतीने सर्व रक्तदात्यांना गृहोपयोगी वस्तू, प्रमाणपत्र व नवीन वर्षाचे कॅलेंडर भेट देण्यात आले. सर्व रक्त दात्यांसाठी चहा बिस्कीट व पौष्टिक नाश्त्याची व्यवस्था फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली होती.

जिल्हा रुग्णालय रक्त पेढीचा २०२४ चा पाच हजारावा रक्तदाता होण्याचा मान ज्येष्ठ नागरिक राजन उत्तेकर यांना मिळाला.

फाउंडेशनच्यावतीने बांधकाम व्यावसायिक प्रदीप वाखुरे, नोटरी पब्लिक विक्रम वाडेकर (विश्वस्त श्री जगदंबा देवी ट्रस्ट, मोहटे), छायाचित्रकार राहुल जोशी, कर सल्लागार विकास जोशी, विमा सल्लागार राहुल काळे, शेतकरी शिवशर्मा चेमटे, दीपक भंडारी, बांधकाम व्यावसायिक सचिन निक्रड, विकास गायकवाड, संजय माने, विपुल वाखुरे, बाळासाहेब पवार, विनय वाखुरे, कैलास नवलानी, उद्योजक अमोल गाडे, मनोज जेटला, युवराज तिपोळे, भूषण शिंदे, किशोर पवार, संग्राम पवार, सुनिल जगताप, आशिष सदावर्ते, आनंदराव पालेकर, माजी सैनिक आंबादास गवंडे, जिल्हा रुग्णालय रक्त पेढीतील मोहन पोकळे, इंजिनीअर कैलाश दिघे यांनीही इतरांसह रक्तदान करून शिबीर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय सुरू करावा

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन



आपलं ऑनलाईन सर्विस केंद्र या नूतन ई सेवा केंद्राचा शुभारंभ प्रसंगी आ. संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला.

नगर - सुशिक्षित पदवीधर तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता आपला व्यवसाय सुरु करून स्वावलंबी व्हावे. व्यवसाय करता करता आपण समाजसेवा ही करावी आपण करीत असलेल्या व्यवसाय हा समाजाची एक सेवाच आहे, ही मनात ठेवून व्यवसाय वाढवावा, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी आपलं ऑनलाईन सर्व्हिस केंद्र या नूतन ई सेवा केंद्राचा शुभारंभ करताना व्यक्त केला.

केंद्राच्या संचालिका सौ. माधुरी पवन रोकडे यांनी बालिकाश्रम रोड आपलं नवीन ई-सेवा केंद्र सुरु करून सामान्य जनतेस करिता उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी रोकडे परिवारास शुभेच्छा दिल्या. यावेळी पवन रोकडे त्याचप्रमाणे रोकडे परिवारातील सदस्य, नगरसेविका वंदना ताठे, अनिल बोरुडे, योग वर्धिनी क्लासेसच्या सौ. शारदा देशपांडे आदी उपस्थित होत्या. पवन रोकडे यांनी स्वागत करून त्यांचा सत्कार केला.

# खिस्तजन्मोत्सव सप्ताह कार्यक्रमांतर्गत नववर्षाचे स्वागत



अहमदनगर पहिली मंडळी हातमपुरा येथील चर्चमध्ये नूतन वर्षानिमित्त विशेष भक्ती करताना चर्चचे धर्मगुरू रेव्ह. अभिजीत तुपसुंदरे समवेत मंडळीतील सभासद व समाज बांधव उपस्थित होते. (छाया - यतीन कांबळे)

नगर - १ जानेवारी २०२५ रोजी नुतन वर्षा-निमीत्त चर्चमध्ये विशेष भक्तीचे नियोजन केले गेले. नुतन वर्ष तसेच प्रभु येशूचे नामकरण दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. चर्चचे धर्मगुरु यांनी उपस्थित भक्तगणांना नुतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

आपल्या प्रवचानातून परमेश्वरांने पुन्हा एक नविन वर्ष आपल्याला दाखविले आहे म्हणून त्या सर्वसमर्थ परमेश्वराचे आपण आभार मानिले पाहिजे. या नविन वर्षामध्ये संकल्प करतांना त्या सर्वसमर्थ परमेश्वराला समोर ठेवून बायबलमधील शिकवणीनुसार आपले आचरण शुध्द आणि पवित्र असायला हवे जेणेकरुन या भुतलावर प्रभु येशूचे दुसरे आगमन होईल त्या दिवशी आपण त्याच्यासमोर उभे राहण्यास लायक ठरु अन्यथा नरकाच्या भयंकर यातनांपासून आपली सुटका नाही असे रेव्ह. तुपसुंदरे पाळकसाहेब आपल्या प्रवचानातून म्हटले.

चर्चमधील भक्ती झाल्यानंतर सभासदांनी एकमेकांना नुतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता चर्चचे धर्मगुरु रेव्ह अभिजीत तुपसुदरे, सचिव सतिश मिसाळ, उपसचिव प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदार सॅम्युएल बोर्डे, कार्यक्रम समिती अध्यक्ष प्रसन्ना शिंदे, प्रा. विनीत गायकवाड, रविद्र लोंढे सुनित ढगे, अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, शोभना गायकवाड, वंदना शिंदे, कांदबरी सुर्यवंशी, शशिकला साळुंके, श्रीमती स्नेहल साळवे हया कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले तसेच कौतुकास्पद परिश्रम चर्चचा तरुण संघाने घेतले महिला मंडळ, चर्च सभासद यांचे सहकार्य लाभले.

# भारतीय क्रिकेट स्पर्धेसाठी सायली काळे हिची निवड



श्रीरामपूर - उदयपूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट मुली स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघामध्ये बोरावके महाविद्यालयाची खेळाडू सायली संतोष काळे (F.Y.B.Sc.) हिची निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या गुणात्मक दृष्टीने ही मोठी अभिमानाची बाब आहे. खेळाच्या विविध प्रकारात खेळाडूंनी महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत नाशिक येथे झालेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धमध्ये खेळाडू कु. सायली काळे हिने उत्कृष्ट खेळ केला होता. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात निवड झाली.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **हिराबाई रावसाहेब कराळे, रा. कापुरवाडी, ता. जि. अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीनीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांना मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यालयात समक्ष हजर राहुन रजिस्टर साठेखत लिहुन व नोंदवुन दिलेले असुन आमचे अशिलांबरोबर कायम खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई,दावा,लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर, पैकी अहमदनगर जिल्हा परिषद पैकी पंचायत समिती पैकी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे **भिंगार** येथील मे. सब रजिस्ट्रार साहेब, अहमदनगर यांचे हद्दीतील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| ग.नं. | | हे. आर. | रु. पै. |
|---|---|---|---|
| १८१/१अ | | ५.८३ | ३.८३ |
| | पो.ख. | ०.०८ | |
| | | ५.९१ | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची उत्तर बाजुची शिव लगतची १ हे ९४ आर + पोख ० हे ० २ आर अशी एकुण १ हे ९६ आर जमीन मिळकती बाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस - गट नं.१८० | दक्षिणेस - गट नं. १८१/१अ पैकी
पश्चिमेस - गट नं. १८४ | उत्तरेस - शिव (रस्ता)

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ०१/०१/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत हि विद्यमान मालक यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाबरोबर सौदा केलेला केलेला आहे. विद्यमान मालकांचे असे म्हणणे की, सदर मिळकतीवर ए.यु. फायनान्स या वित्तीय संस्थे व्यतिरिक्त इतर कोणाचेही, कोणत्याही प्रकारे कर्ज बोजा वगैरे नसून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी ता.नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १५० | ४० | १७० - ३१ चौ.मी. |

(जुना स.नं. १२९/१३१/२/१३४/२)

यापैकी पुर्व बाजूकडील ८६-३१ चौ. मी. खुले प्लॉट क्षेत्र.

**यांसी चतु:सीमा** -
पुर्वेस -प्लॉट नं. ३९, | दक्षिणेस - स.नं. १३० पैकी,
पश्चिमेस - प्लॉट नं. ४० पैकी, | उत्तरेस - ९ मीटर रूंदीचा रस्ता.

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक** -
१) श्री. संतोष बाळू काटकर,
२) सौ. माधुरी संतोष काटकर,
३) श्री. दिपक बाळू काटकर,
सर्व रा. सिव्हील हडको, सावेडी, अहिल्यानगर- ४१४००३.

**ॲड. राजेंद्र पी. शेलोत**
(नोटरी पब्लिक, भारत सरकार)
'अर्हम', प्लॉट नं. २६, आदिनाथ कॉलनी, राऊत मळा, अहिल्यानगर. मो.नं. ९४२२२२३४४१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. प्रकाश गंगाधर भट, वासंती कमलाकर भट, प्रसाद कमलाकर भट, विना प्रसाद बडवे, वृषाली प्रवीण डोक्रस, नलिनी विलास भट, मुकुंद विलास भट, मेघा किरण कुलकर्णी व मिलिंद विलास भट, सर्व रा. अहमदनगर** यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असुन त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे आशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीच्या विक्रीबाबत बोलणी होऊन, मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाकडून विसारा दाखल रक्कम स्वीकारुन सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बोजा नसुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणतेही **चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क,हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खाली दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.
दि. ०१/०१/२०२५.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी मौजे **शहरनगर येथील** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ख्रिस्त गल्ली भागातील सिटी सर्व्हे नं.२६१८ चे एकुण क्षेत्र ११३.७० चौ. मीटर तसेच त्यावरील घराचे बांधकामासह संपुर्ण मिळकत.

**यांसी चतु:सिमा :**
पूर्वेस : सिटी सर्व्हे नं. २६१९ए,
दक्षिणेस : सिटी सर्व्हे नं. २६१९
पश्चिमेस : रस्ता,
उत्तरेस : सिटी सर्व्हे नं. २६१५ व २६१६

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत त्यावरील बांधकामासह तसेच त्यामधील तदंगभूत वस्तुंसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काहीएक राखुन न ठेविता.

**ॲड आनंद आर. फिरोदीया**
पत्ता- ११९, अंबर प्लाझा ए बिल्डींग, एस.टी. स्टॅण्ड जवळ, अहमदनगर. मो. ९८९०६१५२५३



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: शहर अहमदनगर पैकी मौजे माळीवाडा भागातील लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे माळीवाडा येथील सि.स.नं. ४५८६ याचे क्षेत्र १९०.६ चौ.मी. ची मिळकत मुळची सुरेश भास्कर खिस्ती, मकरंद सुरेश खिस्ती व वैष्णवी भालचंद्र कुलकर्णी व रमेश भास्कर ख्रिस्ती यांचे मालकीची असून, सदर मिळकतीमध्ये वरील सुरेश, मकरंद, वैष्णवी यांचा एकत्रात १/२ हिस्सा असून सदरचा १/२ हिस्सा सदरचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल ओंकार कैलास गिरवले यांचे वडिल कैलास रामभाऊ गिरवले यांना कायमस्वरुपी विकण्याचे ठरवून ता. २० मे २०१७ रोजी सदर रक्कमेचा भरणा रुपये २०,००,०००/- घेवून साठेखत करुन दिलेले आहे. सदर साठेखताप्रमाणे मिळकतीमध्ये बांधकाम असल्याने व त्यामध्ये भाडेकरी असल्याने दस्तामध्ये ताबा लिहीला तरी प्रत्यक्षात ताबा मिळाला नाही. तथापी सदर मिळकत ही सत्ता प्रकार २ मध्ये येत असल्याने मुळ मालक यांनी आमचे अशिलाचे वडिल कैलास रामभाऊ गिरवले यांना कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्र करुन दिलेले होते व त्याआधारे मुळ मालकाने त्यांची मदत घेवून मिळकत सत्ता प्रकार २ कमी करुन खरेदी देणे होते दरम्यानचे काळात दि.१६/०४/२०१८ रोजी सदर कैलास गिरवले हे मयत झाले तद्नंतर आमचे अशिल व त्यांचे इतर वारस यांनी वेळोवेळी मुळ मालक यांना मिळकत फ्रिहोल्ड करुन देण्याबाबत विनंती केली असता त्यांनी प्रकरण चालू असल्याचे सांगितले मात्र नुकतेच सदरचे विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत ही त्रयस्त इसम यांना विकण्याचे प्रयत्न सुरु केले असून, सदरचे विद्यमान मालकांनी त्यांचेबरोबर रजि. साठेखत केल्याचे दिसून येते. व सदरचे साठेखत करुन घेणार हे सदरची मिळकत त्रयस्त इसमांस हस्तांतर करणार मिळकतीबाबत आमचे अशिल हे साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेसाठी न्यायालयात कारवाई करीत असल्याने सदर मिळकती बाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, डिड, अगर अन्य कोणताही हस्तांतराचा व्यवहार करु नये. याउपरही कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास व्यवहार करणारास कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत अगर मिळकतीचा कब्जाही मिळणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदर जाहीर नोटीस दिली असे.

**ॲड. स्वप्निल सतीश बिहाणी**
दि. ०१/०१/२०२५
अहमदनगर.
५, रामकमल बंगला, विराज इस्टेट, तारकपुर, बस स्टॅण्ड समोर, अहमदनगर



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. **सदर दुकान जागेवर अहमदनगर शहर सहकारी बँकेचा बोजा असून, मिळकतीवर डॉन बास्को चा बोजा आहे व खरेदीखतापुर्वी सदर डॉन बास्कोचा बोजा पूर्णता: कमी करुन देणार आहे व शहर सहकारी बँकेतून दुकान जागेपुरता बोजा कमी करुन अंशता: गहाणमुक्तीचा लेख नोंदवून देणार आहे. याशिवाय कोणाचाही कसलाही बोजा नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.** परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०१/०१/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे सावेडी** येथील खालील वर्णनाची मिळकत -

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| (९४सी | ७ | ४७६.०० चौ.मी. |
| ९४सी | ८ | ४७६.०० चौ.मी. |
| | | असे एकूण क्षेत्र ९५२.०० चौ. मी.) |

**चालू उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नंबर ९४ सी मधील प्लॉट नंबर ७+८ याचे क्षेत्र ९५२.०० चौ. मी.**

यांसी चतु:सीमा -
पूर्वेस : प्लॉट नंबर ६
दक्षिणेस : प्लॉट नंबर १४, १५, १६ व १७
पश्चिमेस : प्लॉट नंबर ९
उत्तरेस : १८. २८ मी वॉईड रुंदीचा रस्ता

**यावर बांधलेल्या इमारतीचे नाव - देव गुलमोहर**
**यापैकी**
**ग्राऊंड फ्लोअर मधील दुकान नंबर ९ यांचे कारपेट क्षेत्र १७.१६ चौ.मी. याचे बिल्टअप क्षेत्र २२.२३ चौ. मी. ही मिळकत.**

यांसी चतु:सीमा -
पुर्वेस - दुकान नंबर ८ | दक्षिणेस - पार्किंग
पश्चिमेस - दुकान नंबर १० | उत्तरेस - रोड

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
**प्लॉट नंबर ७ चे मालक - रावसाहेब दगडू पवार विकसन करारधारक व मुखत्यारधारक - सुनिल सुदामराव गडदे व प्लॉट नंबर ८ चे मालक सुनिल सुदामराव गडदे** रा. कुलस्वामिनी, देव कॉर्नरच्या मागे, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर

# जिप्सी प्रतिष्ठानच्यावतीने नटराज पूजन करून नवीन वर्षाचे स्वागत



नवीन वर्षाचे स्वागत आ. संग्राम जगताप यांचे हस्ते अभिनेते श्रेणीक शिंगवी, अध्यक्ष शशिकांत नजान, अनंत रिसे, स्वप्नील मुनोत, शेखर वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत नटराज पूजन करून करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नगर – जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने नवीन वर्षाचे स्वागत आ. संग्राम जगताप यांचे हस्ते ज्येष्ठ अभिनेते श्रेणीक शिंगवी, अध्यक्ष शशिकांत नजान, अनंत रिसे, स्वप्नील मुनोत, शेखर वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत नटराज पूजन करून करण्यात आले.

या वेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की नाटक हे सामाजिक प्रश्न मांडण्याचे प्रभावी माध्यम आहे. नाटक फक्त मनोरंजनच करीत नाही तर विविध विषयांवर, सामाजिक प्रश्नांवर भाष्य करून जनजागृती करण्याचे काम रंगभूमीच्या माध्यमातून करते. अहिल्यानगर चे कला विश्व अतिशय प्रभावी असून सांस्कृतिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग केले जातात. नवीन वर्षाचे स्वागत प्रत्येकजन आपल्या पद्धतीने करीत असतात पण सातत्याने २६ वर्ष जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने नटराज पूजन करून नवीन वर्षाचे स्वागत ही प्रथा कौतुकास्पद आहे. नाटक ही जिवंत कला आहे. ही कला सादर करण्यासाठी शहरात अद्यावत नाट्यगृह येत्या काही महिन्यात पूर्ण होणार असून आपल्या शहराची सांस्कृतिक श्रीमंती यापुढील काळात मोठी आणि यशस्वी वाटचाल करेल, यासाठी शहरातील सर्व कलाकारांनी पुढाकार घ्यावा यासाठी आपण सर्वोतोपरी सहकार्य करू असे आ. संग्राम जगताप यांनी सांगितले.

शशिकांत नजान म्हणाले की १९९७ ला सुरू झालेली जिप्सी प्रतिष्ठानच्या वतीने नटराज पूजन करून नवीन वर्षाचे स्वागत करण्याची प्रथा असून ज्या नाट्य कट्ट्यावर नाटक सुचते, अनेक कलाकृतींचा जन्म ज्या ठिकाणी होतो, नाट्यकर्मींच्या कल्पना मूर्त रूप धारण करतात त्या कट्ट्यावर साधेपणाने कोणताही सत्कार समारंभ न नटराज पूजन करण्याची सुरू झालेली प्रथा नगरच्या नाट्य क्षेत्रातील एक अविभाज्य घटक झाले आहे.

श्रेणीक शिंगवी म्हणाले, जिप्सी प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक कलाकार तंत्रज्ञ तयार झाले, घडले त्यांना नाट्य–चित्रपटात क्षेत्रात मोठी संधी निर्माण झाली. तंत्रशुद्ध कलाकार आणि तंत्रज्ञ घडविणे याच बरोबर नगरच्या सांस्कृतिक क्षेत्रात विविध प्रयोग करणे हे महत्वाचे कार्य या संस्थेमार्फत होत आहे. अनंत रीसे यांनी सूत्रसंचालन केले तर स्वप्नील मुनोत यांनी आभार मानले. यावेळी विक्रम विरोळे, राजेंद्र बोर्डे, सचिन पवार उपस्थित होते.



## ३१ डिसेंबरचे औचित्य साधून राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानच्यावतीने मनोरुग्णांना भोजन

३१ डिसेंबर निमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून शहरातील मनोरुग्ण विकलांगांना सांभाळणारी मानव सेवा संस्थेतील रुग्णांना जिजाऊ प्रतिष्ठानच्या वतीने भोजन देण्यात आले. यावेळी पप्पू गीते, दत्ता साठे, निलेश म्हसे, ॲड. चेतन रोहकले, शशिकांत भामरे, आनंद किलोर, बापूसाहेब राजेभोसले, उदय अनभुले, मिलिंद जपे, अतुल लहारे, राजेंद्र कर्डिले, श्रीपाद दगडे, संजय चव्हाण, राजेंद्र ससे, रामदास वाघ व राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते.



भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्तीमध्ये ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशनद्वारे बाळ गोपाळांसमवेत ख्रिस्त जयंती सोहळा साजरा करण्यात आला.

# ब्रेड ऑफ लाईफ फाऊंडेशनद्वारे भिंगारला बाळगोपाळांसमवेत ख्रिस्त जयंती साजरी

नगर – भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्ती मध्ये ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाऊंडेशनद्वारे बाळ गोपाळांसमवेत ख्रिस्त जयंती सोहळा ३० डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला.

नाताळनिमित्ताने सेवावस्तीमधील १५० हुन अधिक बाळगोपाळांना खाऊच्या पुड्यांचे वाटप करण्यात आले. सांताक्लॉज समवेत उपस्थित सर्व बालकांनी मोठया आनंद व उत्साहाने नाचगाण्यात भाग घेऊन कार्यक्रमाला शोभा आणली.

यावेळी सांताक्लॉजची टोपी परिधान केलेले बाळ गोपाळ दिसून येत होते. या प्रसंगी प्रौढ स्त्रीया, वृध्द, तरुण तरुणी व बालकांकरीता उबदार कपडे, खेळणी यांचे ८० कुटुंबानी लाभ घेतला. इंदिरा सेवावस्तीतील नंदाताई राय यांनी बोल फाऊंडेशन प्रती आभार व्यक्त केले. फाऊंडेशनचे संस्थापक गौरव पाटोळे यांनी प्रास्ताविक केले.

सेवावस्तीतील भारत ठोकळ, विनोद उमाप, सुनील वैराळ, सागर कांबळे, धनंजय घोरपडे, दिनेश जाधव व सौ. व श्री. दत्ता क्षिरसागर यांचे सहकार्य लाभले.

बोल फाऊंडेशनच्या परिवारातील अध्यक्ष जोसेफ पाटोळे, सचिव शोभा पाटोळे, विश्वस्त श्रुती पाटोळे, अमित पाटोळे, स्वयंसेवक अंतोन पाटोळे, सुशीला पाटोळे, आरती नितीन पाटोळे व रुबेन रवि मुदलियार यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी सांताक्लॉज बनलेले कुमार गॅब्रिएल पाटोळे, आरुष पाटोळे व काव्या पाटोळे यांचे आकर्षण वाखण्यासारखे ठरले.

# सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने प्रोफेसर कॉलनी चौकात मध्यरात्री १२ वाजता नटराज पूजनाने नववर्षाचे स्वागत

## नववर्षाचे हे अनोखे स्वागत तरुणांना दिशा दर्शक : डॉ.सौ.सुधा कांकरिया



नववर्षाचे स्वागत प्रोफेसर कॉलनी चौक येथे सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने मध्यरात्री १२ वाजता नटराज पुजन करुन करण्यात आले.

नगर – भारतीय संस्कृती ही जगात महान संस्कृती म्हणून ओळखली जाते. त्यामुळे आपल्या संस्कृतीचे संरक्षण करणे गरजेचे आहे. थर्टीफस्टला घांगडधिंगाना घालून समाजात उपद्रव निर्माण करण्यापेक्षा काही विधायक कामे केली तर ती समाजासाठी व येणार्या पिढीसाठी आदर्शवत ठरतील. त्यामुळे युवकांनी अशाच विधायक कामात आपला वेळ घालविला पाहिजे. युवा शक्तीने आपली बुद्धमत्ता, ताकदीचा उपयोग हा देशाच्या विकासासाठी केला पाहिजे. सरत्या वर्षात नगर–मधील कलाकारांनी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमातून चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे आगामी वर्ष हे बालिका वर्ष म्हणून साजरे करूया तसेच अहिल्यानगर कलाकारांसाठी उज्वल राहील. सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने नववर्षाचे हे अनोखे स्वागत तरुणांना दिशा दर्शक असे आहे, असे प्रतिपादन डॉ.सुधा कांकरिया यांनी केले.

नववर्षाचे स्वागत प्रोफेसर कॉलनी चौक येथे सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने मध्यरात्री १२ वाजता नटराज पुजन करुन करण्यात आले. याप्रसंगी शिल्पकार प्रमोद कांबळे, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, पवन नाईक, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विराज मुनोत, तेजस अतितकर, संकेत होशिंग, अनंत जोशी, सदानंद भणगे, भूपेंद्र रासने, पूनम रासने, संदीप दंडवते, प्रशांत जठार, ॲड. सतीशचंद्र सुद्रिक, सुजाता पायमोडे, सरिता पटवर्धन, संदीप भुसे, सुधीर कुलकर्णी, अभय गोले, विनय मुनोत, गौरी सुद्रिक, बालकलाकार ध्वज मुनोत आदि उपस्थित होते.

गौरी सुद्रिक यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित पोवाडा सादर केला.

यावेळी सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे कलाकारांचा गौरव करण्यात आला. यामध्ये संजोग धोत्रे, अवनती गोले, सिद्धी कुलकर्णी, पवन नाईक, तसेच देखावा व रिकामिक एकांकिकांचे संघ, फुलपाखरू बालनाट्य संघ राजश्री भणगे आदींचा सन्मान करण्यात आला

यावेळी प्रमोद कांबळे, पवन नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ.सुधा कांकरिया यांनी सर्वांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. सूत्रसंचालन तेजस अतितकर यांनी केले तर आभार विराज मुनोत यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी ऋषिकेश जोशी, आशुतोष मेनसे, क्षितिजा होशिंग, पुष्कर शुक्रे, मंगेश जोशी, सचिन तुपे, निखिल डफळ, रघुनाथ सातपुते आदींनी सहकार्य केले.



न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे स्टेनोग्राफर लघुलेखक शिवाजी साबळे यांच्या सेवापुर्ती सन्मान सोहळ्यामध्ये त्यांचा सपत्नीक सत्कार करताना आ. संग्राम जगताप, हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार आदी.

# महाराष्ट्र दिव्यांगत्व संशोधन समितीकरिता नावे सादर करा

नगर – महाराष्ट्र राज्य दिव्यांगत्व संशोधन समितीवर नियुक्तीकरिता अशासकीय सदस्य म्हणून राज्य शासनाने दिव्यांग व्यक्तींमधून सदस्य म्हणून ७ अशासकीय सदस्य किंवा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाच्या कलम (झेड) च्या कलम २ अंतर्गत संस्थाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यासाठी माहिती सादर करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांनी केले आहे.

राज्य शासनाने दिव्यांग व्यक्तीमधून सदस्य म्हणून नामनिर्देशित केलेल्या सात व्यक्ती किंवा अधिनियमाच्या कलम (झेड) च्या कलम २ अंतर्गत संस्थाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सदस्यांनी नाव, पत्ता, संपर्काचा क्रमांक व ई–मेल, संपूर्ण वैयक्तिक माहिती, उल्लेखनीय कार्य केल्याची कामगिरी इत्यादी माहिती समाज कल्याण विभाग अहिल्यानगर या कार्यालयात ६ जानेवारी २०२५ पर्यंत पोस्टाने किंवा समक्ष उपस्थित राहून सादर करावी, असेही कळविण्यात आले आहे.

# बहुआयामी शिवाजी साबळे यांनी न्यू आर्ट्स कॅम्पसचे व्हिजन जपल्याने मिळाली प्रतिष्ठा

### पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन

नगर – बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे निवृत्त लघुलेखक–स्टेनोग्राफर शिवाजी साबळे यांनी न्यू आर्ट्स कॅम्पसचे व्हिजन जपले. त्यांच्यामुळे परिसर सुंदर आणि सुरक्षित राहू शकला. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थिनींना आपण सुरक्षित असल्याची जाणीव झाल्यामुळे या महाविद्यालयाची प्रगती झाली आणि संस्थेला तसेच महाविद्यालयाला देशभरात प्रतिष्ठा मिळाली असे गौरवोद्गार राज्य शासनाच्या आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष, आदर्श गाव हिवरे बाजारचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांनी काढले.

अहिल्यानगर येथील न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे स्टेनोग्राफर लघुलेखक शिवाजी जगन्नाथ साबळे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा, सन्मान कर्तुत्वाचा असामान्य बुद्धिमत्तेचा नव्या इनिंगचा या कार्यक्रमात पवार बोलत होते. ते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सेवापूर्ती निमित्त साबळे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी व्यासपीठावर पद्मश्री पोपटराव पवार, आ.संग्राम जगताप, शिवाजी साबळे, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, प्राचार्य डॉक्टर बी. एच. झावरे, जिल्हा बालकल्याण समितीचे चेअरमन जयंत ओहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. अरुण पंधरकर, सिनेट सदस्य डॉ. एकनाथ खांदवे, सिनेट सदस्य अमोल घोलप, सिनेट सदस्य डॉ. युवराज नरवडे, पुणे विद्यापीठाच्या स्थायी समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. सुभाष कडलग, डॉ.सजनकुमार खपके, डॉ. अरुण पवार, प्रा. भाऊसाहेब बानकर, प्रा. शिवाजी बानकर, सरपंच सुभाष पवार, ज्ञानदेव पांडुळे, स्थायी समिती सभापती मनोज कोतकर, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, रवींद्र बारस्कर, सौ. निर्मला शिवाजी, श्रीमती तारामती साबळे आदी उपस्थित होते.

पोपटराव पवार पुढे म्हणाले की, हिवरे बाजार मध्ये ज्या पद्धतीने सर्वांच्या प्रयत्नातून एकत्रित परिसर विकासाचे काम झाले त्याची मुहूर्तमेढ न्यू आर्ट्स महाविद्यालयातच रोवली गेली. आपण सरपंच झाल्यानंतर पहिला राज्यस्तरीय एनएसएसचा कॅम्प हिवरे बाजार मध्ये घेतला. एकत्रित श्रमदानातून गावच्या विकासाला सुरुवात झाली. महाविद्यालयाचा मी माजी विद्यार्थी आहे तिथूनच मला सामाजिक कार्याच्या कामात झोकुन देण्याची प्रेरणा मिळाली. शिवाजी साबळे महाविद्यालयात लघुलेखक टंकलेखक म्हणून नोकरी करीत होते. आपली नोकरी काम सांभाळून त्यांनी न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज चा परिसर सुरक्षित, स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचे काम केले. यामुळे शिक्षणासाठी ग्रामीण भागातून आलेल्या युवतींना अधिक सुरक्षित वातावरण मिळाल्याने त्यांचा शिक्षण घेण्याचा रूप वाढला आणि गुणवत्तेत महाविद्यालयाने दाखविलेल्या प्रगतीमुळे महाविद्यालयाचा लौकिक वाढला. महाविद्यालयाला राज्यात प्रतिष्ठा मिळाली. विशेष कार्यकारी अधिकारी बरोबरच साबळे यांना पुणे विद्यापीठाच्या सिनेट सदस्य पदी राज्यपाल मनोनित होण्याचा मान मिळाला. त्याच काळात त्यांनी राज्यपाल आणि कुलगुरूंच्या आग्रहाने आपल्याला देखील तेथे काम करण्याची संधी मिळवून दिली. एखाद्या गोष्टीत घुसून कसे काम करायचे विद्यार्थ्यांच्या हितासाठी एखादी गोष्ट सिनेटमध्ये कशी लावून धरायची याचे चांगले कसब साबळे यांच्याकडे आहे. ते आता जरी निवृत्त झाले तरी ते सामाजिक जीवनातून निवृत्त होतील असे त्यांचे व्यक्तिमत्व नाही. त्यामुळे संस्था आणि महाविद्यालयाने त्यांना पुन्हा सेवेत घेऊन महाविद्यालयाचा लौकिक वाढवण्यासाठी त्यांची मदत घ्यावी. आमदार संग्राम जगताप यांनी महानगरपालिकेत नगरसेवकपदी त्यांना घेऊन संधी द्यावी आणि त्यांच्या सामाजिक कार्याचा समाजाला अधिक कसा उपयोग होईल याचा विचार करावा असे पवार यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांनी म्हटले की शिवाजी साबळे यांचे सामाजिक काम मोठे आहे. हा माणूस घरात कधी थांबलाच नाही. कुटुंबाला वेळ न देता समाजाला तो दिला. आपल्या पत्नीला नेवासा येथील महाविद्यालयात नोकरी लागली होती. पण तेथे जेव्हा कायमस्वरूपी नियुक्ती देण्याची वेळ आली तेव्हा तेथील एका महिला प्राध्यापिकेने आपल्याला ही संधी मिळावी आपल्या कुटुंबाचे कल्याण होईल. साबळे यांना कायम स्वरूपातील नोकरी आहे अशी विनंती केली. तेव्हा लगेच साबळे यांनी आपल्या पत्नीचा दावा रद्द केला. हे सहजासहजी कोणी करत नाही. महाविद्यालयातील महिला मुली यांना त्यांनी संरक्षण दिले तेव्हा कोणत्याही परिणामाची परवा त्यांनी केली नाही. त्यामुळे माजी विद्यार्थ्यांनी त्यांचा सत्कार सोहळा केला.

यावेळी महिला बालकल्याण समितीचे चेअरमन जयंत ओहोळ, स्थायी समिती सभापती मनोज कोतकर, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मकरंद घोडके, आप्पासाहेब शिंदे, सौ. निर्मला साबळे, ॲड. अनुराधा येवले यांची भाषणे झाली.

प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विठ्ठल लांडगे यांनी केले. स्वागत ॲड. शिवाजी डोके यांनी केले तर आभार प्रसाद डोके यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष गाडे, गजेंद्र भांडवलकर, योगेश राखे, प्रसाद डोके, विशाल म्हस्के, वैभव म्हस्के, ओंकार गोडळकर, अजित शिरसाठ, प्रणव कदम, अभिजीत गडाख, वैष्णवी साबळे, सत्यम साबळे यांनी परिश्रम घेतले.


**महाराष्ट्र शासन**

रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर

पत्ता :– बांधकाम भवन, नगर– औरंगाबाद रोड, अहिल्यानगर

ई–मेल पत्ता :– egsahmednagar.eemahapwd.com दुरध्वनी / फॅक्स क्रमांक ०२४१–२४२२९३८

**द्वितीय ई–निविदा सुचना क्रं. १५ सन २०२४–२५**

कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल. खालील कामांकरिता ब–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो. ( कार्य). विभाग अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत लाखात | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|
| १. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील पाथर्डी तालुक्यातील राज्य मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | २०.८० | वर्ग ५–अ व त्यावरील |
| २. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील पाथर्डी तालुक्यातील प्रजिमा मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | ८४.०३ | वर्ग ४ – अ व त्यावरील |
| ३. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नेवासा तालुक्यातील राज्य मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | २०.८० | वर्ग ५–अ व त्यावरील |
| ४. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील नेवासा तालुक्यातील प्रजिमा मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | १६९.७२ | निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल |
| ५. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील राहुरी तालुक्यातील राज्य मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | २०.८० | वर्ग ५–अ व त्यावरील |
| ६. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील राहुरी तालुक्यातील प्रजिमा मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | ६०.३२ | वर्ग ४ – अ व त्यावरील |
| ७. | अहिल्यानगर शहर बाह्यवळण रस्ता रा.मा. ५८ रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | १३.३१ | वर्ग ६ – अ व त्यावरील |
| ८. | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील शेवगाव तालुक्यातील प्रजिमा मार्ग रस्त्यांच्या कडेला वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | १०५.६६ | वर्ग ४ व त्यावरील |
| ९ | रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहिल्यानगर या कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय इमारती व मोकळ्या जागा परीसरात वृक्षलागवड करणे. व सदर लागवडीचे तीन वर्षासाठी देखभालीसह संवर्धन करणे. | २०.८० | ५–अ व त्यावरील |

टिप :– सदर निविदेमध्ये मागणी केलेप्रमाणे Similar Type of Work and Bid Capacity Certificate ही कागदपत्रे सादर करणे बंधणकारक आहे. तरच सदर ई– निविदेमध्ये ठेकेदारांना पात्र केले जाईल अन्यथा अपात्र केले जाईल याची ठेकेदारांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | :– | दिनांक १/१/२०२५ ते दिनांक ८/१/२०२५ |
| निविदापूर्व बैठक | : – | अ.क्र. ४ दि. ३/१/२०२५ बैठकीचे ठिकाण अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहिल्यानगर) वेळ :– दुपारी १५.०० वाजता |
| ई–निविदा उघडणे | : – | दिनांक ९/१/२०२५ |

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. www.mahapwd.com 2. mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) ३. कार्यकारी अभियंता रो.ह.यो. (कार्य). विभाग अहिल्यानगर कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/निविदा/ ५७०६ सन २०२४
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय, रो.ह.यो. (कार्य) विभाग,
अहिल्यानगर दिनांक २०/१२/२०२४

(कैं. बी. दंडगव्हाळ)
कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (कार्य)
विभाग, अहिल्यानगर


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



## ओढ अंतरीची

*आधुनिक सुखसोयींनी संपन्न असणाऱ्या शहरांमध्ये वास करण्याकडे माणसाचा ओढा वाढला आणि काँक्रिटच्या जंगलात राहण्याची सवयच लागली. पण आजही निसर्गाचा शेजार जपणारी अशी टुमदार वस्ती पाहिली की अंतर्मन तिकडे झेपावू लागतं. दृष्टी पडेल तिथपर्यंत दिसणाऱ्या त्या सौंदर्यखुणा टिपण्यासाठी नजर भिरभिरु लागते. तिथली शांतता मनाच्या गाभाऱ्यात भरुन उरते, आपल्याला श्वासाची लय जाणवू लागते आणि तिथेच स्वत:ची स्वत:शी रम्य भेट होते...!*

# कॅलिडोस्कोप

## सरकारी कर्मचाऱ्यांना डेस्कवर उभे राहण्याची शिक्षा!

वृद्ध व्यक्ती सरकारी कार्यालयात गेल्यानंतर तिला तास न् तास उभे राहायला लावले, तर संताप येणारच. सामान्यत: सरकारी कार्यालयांमध्ये असे दिसून येते, की कर्मचारी लोकांच्या समस्या उशिरा ऐकतात आणि त्यांना त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी तास न तास वाट पहावी लागते; पण नोएडामधील एका सरकारी विभागाच्या कर्मचाऱ्यांना एका वृद्ध व्यक्तीसोबतचे असे वागणे महागात पडले.

एका आयएएस अधिकाऱ्याला सरकारी कार्यालयात तास न तास उभे राहावे लागल्याची माहिती मिळाली. नाही आणि त्याला बराच वेळ वाट पाहण्यास लावल्याबद्दल कर्मचाऱ्यांना शिशा सुनावण्यात आली.

आयएएस अधिकारी डॉ. लोकेश यांच्या लक्षात आले, की कर्मचारी एका वृद्धाला तास न तास थांबून ठेवत आहेत. त्यांनी या कर्मचाऱ्यांना २० मिनिटे उभे करून वृद्ध व्यक्तीला कसे थांबवले आहे, याची जाणीव करून दिली. लोकेश यांनी सांगितले, की सीसीटीव्हीमध्ये

सीसीटीव्हीद्वारे तक्रारीची पुष्टी झाली तेव्हा अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि सर्व कर्मचाऱ्यांना २० मिनिटे उभे राहण्याची शिक्षा दिली. एका वृद्ध व्यक्तीला बराच वेळ थांबवल्यानंतर सुमारे १६ कर्मचाऱ्यांना त्यांच्या जागेवरून उठून त्यांच्या डेस्कवर २० मिनिटे उभे राहण्यास सांगण्यात आले. ही घटना नोएडाच्या निवासी भूखंड विभागात घडली. तिथे एका वृद्ध व्यक्तीचे ऐकले



त्यांना दिसले, की कर्मचाऱ्यांनी त्या व्यक्तीच्या मालमत्तेशी संबंधित प्रश्न सोडवला नाही आणि त्याला सुमारे एक तास उभे ठेवले. विभागाच्या कार्यालयात आल्यावर वृद्ध व्यक्तीची समस्या लगेच ऐकली जात नाही, हे पाहून लोकेश यांनी या सर्वांना शाळेत मुलांना उभे राहण्याची शिक्षा दिली जाते, तशीच शिक्षा करण्याचे आदेश दिले. त्यांचे आता कौतुक होत आहे.



## मोरांच्या प्रेमापोटी...

ओरिसातल्या कटकजवळ एका डोंगराच्या पायथ्याशी वसलेलं सिद्धेश्वर फायरिंग रेंज पिकॉक व्हॅली म्हणून ओळखलं जातं. १९९९ मध्ये ओरिसात मोठं वादळ आलं होतं. त्यावेळी तीन मोर जखमी अवस्थेत या परिसरात आले. पन्नू बेहरा नामक व्यक्तीने या मोरांची खूप सेवा केली. त्यानंतर या परिसरात मोरांचा वावर वाढला. त्यांची संख्या ६० पर्यंत पोहोचली. आज या भागात १२० च्या आसपास मोर आहेत. पन्नू बेहरा आज या जगात नाहीत. मात्र त्यांचा नातू कान्हू बेहरा आता ही जबाबदारी सांभाळत आहे. मोरांप्रती असलेल्या प्रेमापोटी कान्हूने चांगल्या कंपनीतली नोकरी नाकारली. मात्र सरकारने त्यांना नोकरी दिली. कान्हूचा आवाज ऐकताच मोर या भागात येतात. पन्नू या भागात होमगार्डचं काम करायचे. त्यांच्या मृत्यूनंतर साधारण दहा दिवस मोर फिरकलेच नाहीत. पन्नू यांना आजारपणातही मोरांची काळजी सतावायची. त्यांनी ही जबाबदागी नातू कान्हूवर सोपवली. मोरांच्या अन्नपाण्याचा दिवसाचा खर्च ५०० रुपये आहे. सकाळी ६ ते ८ आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत तो मोरांना दाणापाणी देतो. कान्हूला मार्च महिन्यात होमगार्डची जबाबदारी देण्यात आली. पदवीधर कान्हूला एक कंपनीकडून १८ हजार रुपये पगाराच्या नोकरीचा प्रस्ताव आला होता. मात्र मोरांच्या सेवेसाठी त्याने ही नोकरी नाकारली. कान्हूचं करावं तेवढं कौतुक कमी आहे.

## काय सांगतोय हॉर्न?


धुरांच्या रेषा हवेत सोडणाऱ्या झुकझुक गाडीशी आपली लहानपणीच ओळख होते. गाडीने हॉर्न दिला की आपण चढतो. मात्र प्रत्येक कारणासाठी वेगवेगळ्या पद्धतीने हॉर्न वाजवले जातात. मोटरमन आणि गार्डला एकमेकांशी ताळमेळ बसवता यावा यासाठी प्रत्येक हॉर्न वेगळा असतो. यातला फरक आपल्याला कळत नाही. पण गार्डला हॉर्नचा अर्थ बरोबर कळतो. मोटरमनने एकदाच छोटा हॉर्न दिला तर गाडी यार्डमध्ये जाण्यासाठी तयार असल्याचं समजलं जातं. दोन वेळा छोटा हॉर्न वाजवून चालक गार्डकडे गाडी सुरू करण्याची परवानगी मागत असतो. ट्रेन सुरू असताना तीन वेळा छोटा हॉर्न वाजवला तर चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटलं आहे असं समजावं. यानंतर गार्ड आपल्या डब्यातल्या व्हॅक्युम ब्रेकचा वापर करतो. अचानक गाडी थांबल्यानंतर चालकाने चार वेळा हॉर्न दिला तर गाडीचं इंजिन खराब आहे किंवा गाडी पुढे नेता येणार नाही असं समजलं जातं. चालकाने एकदा मोठा आणि त्यानंतर छोटा हॉर्न दिला तर गार्डने गाडी सुरू होण्याआधी पुन्हा एकदा ब्रेक पाईप सिस्टिमची तपासणी करायची असते. सतत बराच काळ हॉर्न वाजवला जात असेल तर गाडी कोणत्याही स्थानकावर न थांबता पुढे जाणार असल्याचं समजलं जातं. चालकाने सहा वेळा छोटा हॉर्न वाजवला तर तो पुढे दिसत असलेल्या धोक्याचा संकेत असतो.





## भीतीदायक ठिकाणं

या जगात भन्नाट ठिकाणांची कमतरता नाही. काही ठिकाणी आपण जाऊ शकत नाही इतकी ती भयानक असतात. ब्राझीलमध्ये साओ पालो बेटाला स्नेक आयलंड म्हणूनही ओळखलं जातं. इथे असंख्य साप आढळतात. या बेटावर एवढे साप कधी आणि कसे आले हे कोणालाच माहीत नाही. इथे प्रत्येक चौरस मीटर परिसरात पाच साप आढळतात. सापांच्या प्रचंड संख्येमुळे या बेटावर यायला लोक खूप घाबरतात. इथले साप खूप विषारी असतात. जपानमधल्या ओकिघारामध्ये सुसाइड फॉरेस्ट नावाचं एक ठिकाण आहे. २००२ मध्ये या ठिकाणी ७८ लोकांनी आत्महत्या केली होती. हे जंगल माउंट फुजीच्या पायथ्याशी वसलं आहे. इथे अनेक लोक आत्महत्या करतात. आत्महत्या केलेल्या लोकांचे मृतदेह नेण्यासाठी स्थानिक पोलिसांना विशेष अभियान राबवावं लागतं.



## लेहंगा घालून नववधू स्पोर्टस् बाईकवर!

लेहंगा घातलेली नववधू स्पोर्टस् बाईक भरधाव वेगात चालवत असल्याचे पाहून आश्चर्याचा धक्का बसेल ना? परंतु, खरोखरच नववधू लेहेंगा परिधान करून भरधाव वेगात दुचाकी चालवताना दिसली. नवरीची ही स्टाईल पाहून अनेक जण आश्चर्याने पाहतच राहिले. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये वधूच्या जवळून जाणाऱ्या वाहनांमधून प्रवास करणारे लोक कॅमेरे काढून व्हिडीओ बनवत आहेत. जणू त्यांनी जगातील आठवे आश्चर्य पाहिले आहे. व्हिडीओमध्ये वाजत असलेले 'फिर भी ना मिला सजना' हे गाणे वधूच्या लूकला आणि शैलीला खूप शोभते. दबंग वधूच्या या स्टाईलने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे आणि आता लोक इंटरनेटवर याबद्दल चर्चा करत आहेत. नववधू आपला वर राजा म्हणजेच साजनला शोधण्यासाठी निघाली आहे. लाल लेहंगा आणि रोअरिंग स्पोर्टस्? बाईक वधूच्या सौंदर्यात आणि वर्चस्वात भर घालताना दिसतात. नववधूने लेहंगा घालून बाइक चालवण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने आपल्या वराला बुलेटवर बसवून फिरवले होते. हा व्हिडीओ आतापर्यंत ८३ लाखांहून अधिक वेळा पाहिला गेला आहे आणि व्हिडीओला दोन लाख ९६ हजारांहून अधिक वेळा लाईकदेखील करण्यात आले आहे. एका यूजरने लिहिले, 'दबंग वधूला पाहून मला गरीब वराची दया येते!'



## हात दाखवून भरता येते बील!

भारतातील बहुतेक दुकाने आणि मॉल्समध्ये ऑनलाइन पेमेंट पर्याय उपलब्ध आहेत. गेल्या काही वर्षांत भारतातील प्रत्येक गावात ऑनलाइन पेमेंट आणि कॅशलेस तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आहे; पण आजही भारत या बाबतीत आपला शेजारी देश चीनपेक्षा ५० वर्षे मागे आहे. चीनमध्ये क्यूआर पेमेंट आता भूतकाळातील गोष्ट बनली आहे, तर चीनी लोकांनी फार पूर्वीच त्यांच्या खिशात कार्ड आणि रोख ठेवणे बंद केले आहे. बहुतेक दुकानांमध्ये क्यूआर कोडही नसतात. चीनमध्ये फक्त हात दाखवून बँकेतून पैसे कापले जातात. चीनमध्ये केवळ हात दाखवून पैसे दिले जात आहेत. अलीकडेच, 'सोशल मीडिया'वर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यात एक व्यक्ती चायनीजच्या दुकानात ताडीने पेमेंट करत आहे, म्हणजे फक्त हात दाखवून पैसे देत आहे. चीनमधील कोणत्याही दुकानातून खरेदी करता, तेव्हा तेथे बसवलेले स्कॅनर मशीन हात स्कॅन करते, त्यानंतर सर्व बँक तपशील दुकानदाराकडे नोंदणीकृत होतात, त्यानंतर त्या दुकानातून फक्त हात दाखवून वस्तू खरेदी करू शकता. स्कॅनरसमोर हात ठेवताच ती रक्कम आपोआप तुमच्या खात्यातून कापली जाईल आणि दुकानदाराच्या खात्यात हस्तांतरित केली जाईल. अशा प्रकारे यंत्रणा कार्य करते व्हिडीओमध्ये असे सांगण्यात आले आहे की, पेमेंट करण्यासाठी तुम्हाला स्टोअरमध्ये जाऊन फक्त तुमचा हात दाखवावा लागेल. त्यानंतर हात स्कॅन करून स्टोअरमध्ये नोंदणीकृत होईल, त्यानंतर तुम्ही त्या स्टोअरच्या कोणत्याही शाखेत फक्त दाखवून पेमेंट करू शकता. तुझा हात करू शकतो. 'सोशल मीडिया'वर व्हायरल पेमेंट बनवण्याचे हे तंत्र खूप मथळे मिळवत आहे. चीनची ही प्रगती पाहून इंटरनेट वापरकर्तेही आश्चर्यचकित झाले आहेत. हा व्हिडीओ शेअर झाल्यापासून लाखो लोकांनी तो पाहिला असून ५ लाख ७८ हजारांहून अधिक वेळा या व्हिडीओला लाईक करण्यात आले आहे.





## लग्नाचा फोटो फाडून घटस्फोटाची पार्टी

एखाद्या तरुणीचे लग्न होते, तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील आनंद निराळाच असतो. गालावर लाजेची लाली पाहायला मिळते, आपल्या आयुष्याची नवी सुरुवात म्हणून ती खूप उत्साही असते. मुलींच्या चेहऱ्यावरील लग्न झाल्याचा आनंद सगळ्यांनीच पाहिलेला असतो; परंतु घटस्फोटाचा आनंद साजरा करण्याची काही उदाहरणे अलीकडे अनुभवायला मिळत आहेत.

'सोशल मीडिया'वर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यात एक महिला घटस्फोटाचा आनंद साजरा करताना दिसत आहे. घटस्फोटानंतर महिला केक कापताना आणि तिच्या लग्नाचा फोटो फाडताना दिसत आहे. घटस्फोटाचा आनंद साजरा करणाऱ्या महिलेने केक कापला. केकवर 'हॅपी घटस्फोट' लिहिले आहे. पतीपासून विभक्त झाल्यानंतर स्त्रीच्या चेहऱ्यावर लग्नाच्या वेळी दिसणारा आनंद कधीच हिरावून बसतो; मात्र या महिलेने अगदी विरुद्ध काम केले. घटस्फोटाचा आनंद तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

महिलेने आधी 'हॅप्पी डिव्होर्स' केक कापला. नंतर कात्रीने लग्नाचा ड्रेस कापला आणि नंतर लग्नाचा फोटो फाडला. हे सर्व करताना ती खूप आनंदी दिसत होती. महिलेने कापलेला ड्रेस हा तिचा लग्नाचा पोशाख आहे. २०20 मध्ये महिलेचे लग्न झाले. त्यांचे नाते चांगले नव्हते आणि २०२४ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. अवघ्या चार वर्षातच दोघेही वेगळे झाले. पार्टीच्या सेलिब्रेशनमध्ये महिलेचा आनंद पाहून नेटकऱ्यांनी भरभरून कमेंट्स दिल्या आहेत.




## आंब्याच्या पानांपासून मद्य

ग्वाल्हेरच्या जीवाजी विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनी आंब्याच्या पानांपासून मद्य तयार केलं आहे. यात आठ ते बारा टक्क्यांपर्यंत अल्कोहोल असेल. अर्थात हे मद्य आरोग्यासाठी लाभदायी ठरणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या मद्यामुळे मधुमेहावर नियंत्रण मिळवता येईल, असा दावा केला जात आहे. यासोबतच शरीरातले फॅट्स कमी करून रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठीही हे मद्य उपयुक्त ठरू शकतं. हे मद्य तयार करण्यासाठी ४५ ते ५० दिवसांचा कालावधी लागला. यासाठी ग्लुकोज, कर्बोदकं आणि पेप्टॉन प्रोटिन्सचा वापर करण्यात आला. हे मद्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या कंपनीसोबत करार करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. आंब्याच्या पानांमध्ये मँगो फेरीन नावाचा घटक असतो. आपलं आरोग्य राखण्यात या घटकाचा महत्त्वाचा वाटा असतो. आंब्याची पानं बारा महिने उपलब्ध असल्यामुळे कोणत्याही हंगामात हे मद्य तयार करता येईल. येत्या काळात हे मद्य औषध म्हणून वापरलं गेलं तर आश्चर्य वाटायला नको.



## लिंबांवर हजारो रुपयांची बोली!

लिंबू गुणकारी आहे ही बाब कोणीही अमान्य करणार नाही. उन्हाळ्यात लिंबू महाग होत असले तरी ते विकत घेण्यासाठी कोणी काही हजार रुपये खर्च करणार नाही. मात्र देवळात अर्पण केलेल्या लिंबासाठी एका जोडप्याने २७ हजार रुपये मोजले. लिंबाच्या लिलावातून मंदिर प्रशासनाला ६८ हजार रुपये उत्पन्न मिळालं. तमिळनाडूमधल्या एका मंदिरात देवाला काही लिंबू अर्पण करण्यात आले होते. या मंदिरात पंगुनी उथीराम फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. ११ दिवस हा महोत्सव सुरू असतो. यावेळी देवाला अर्पण केलेल्या नऊ लिंबाचा लिलाव करण्यात आला. पहिल्याच लिंबासाठी एका दांपत्याने २७ हजार रुपयांची बोली लावली. त्यांनी हे लिंबू खरेदीही केलं. गेल्या अनेक वर्षांपासून मंदिरात ही परंपरा सुरू आहे. देवळात अर्पण केलेले लिंबू खूपच पवित्र मानले जातात. दैवी महत्त्व लक्षात घेऊन लोक त्यांची खरेदी करतात. हे सगळं ऐकल्यावर लिंबाना एवढी किंमत मिळत असल्याचं बघून आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाही.



